**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७५४/अपील क्रमांक ४१२६/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/३९९५९/अपील क्रमांक ४३८०/०२**

**श्रीमती. अफताब अ. सिद्दीकी -----अपीलार्थी**
**४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं. ५२८,**
**३३ रोड, खार (पश्चिम) मुंबई ५२**

**विरुध्द**

**१. उपमुख्य अभियंता (इ.प्र.) -----उत्तरवादी**
**उपमुख्य अभियंता कार्यालय, पश्चिम उपनगरे,**
**१ ला मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.**
**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र. /एच वार्ड)**
**उपमुख्य अभियंता कार्यालय, पश्चिम उपनगरे,**
**१ ला मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपील क्र. ४१२६/०२ या अपीलाचे आदेश याअगोदरच दि. १७ एप्रिल, २००९ रोजी पारित करण्यात आलेले आहेत. या आदेशात तत्कालीन महापालिका आयुक्त श्री. जॉनी जोसेफ यांनी आयोगास दिलेल्या निवेदनानुसार गेल्या २ वर्षात संगणकीकरण व रेकॉर्ड किपींग याबाबत महापालिकेने केलेल्या कार्यवाहीसंबंधीची माहिती विद्यमान महापालिका आयुक्त श्री. जयराज फाटक यांनी दि. ५ मे, २००९ रोजी आयोगाच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन द्यावी असे निर्देश देण्यांत आले होते. त्याप्रमाणे महापालिका आयुक्त स्वतः उपस्थित राहून आयोगास संगणकीकरणाचे झालेले काम व कामाची पुढील दिशा याबद्दल पुढील निवेदन दिलेले आहे.**

**Sir,**

**The issue was discussed on 05.05.2009 in your chamber when I was also present. The points of discussions were as under:**

1) **regarding new proposals:**

   **In order to streamline and automate the process of approval of building plans, M.C.G.M. has introduced AUTODCR SOFTWARE for computerized approval process. This software is already implemented in the Eastern Subs (Vikhroli) and is at the testing stage at Western Subs. (Bandra) and City (Byculla) Offices. This software will be functional during next two months at these two offices. The software will be implemented at the Kandivali office once the office is relocated in the new building. Most of the records (such as plans, IOD, CC and OCC/BCC) will be available in the digital format (permanently) for the proposals which are approved through this software.**

2) **Regarding scanning of existing files:**

   **All the existing available building proposal files are proposed to be scanned and preserved by floating a tender for Document Management System and fixing Agencies for this purpose. This work will take about six months time if done with multiple agencies and under regular monitoring.**

3) **regeneration of missing files:**

   **All the files which are shown as missing in the various replies given under the RTI Act will be listed. This will be done year-wise starting from year 2008 backwards. These files will be regenerated with the following documents:**

*** IOD, Last Amended Plan**
*** CC**
*** Occupation / BCC letter and plan**
*** Structural Engineers cerft. and plans.**

**These files will be regenerated by using following sources:**

**Architect for the proposal**
**Ward – Building and Factory Deptt.**
**Ward – Water Deptt.**
**Ward – Assessment Deptt.**
**CFO Deptt.**

**All the old files shown as missing files would be regenerated in a phased manner during the next one year.**

**Submitted pleases.**

**Yours faithfully,**
**Sd—**
**Municipal Commissioner**

अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३/५/२००९ रोजीच्या पत्राने ज्या नस्त्या गहाळ झालेल्या आहेत त्यांची यादी तयार करुन दिलेली आहे. तसेच या नस्त्या पुन:र्गठीत करण्याच्या दृष्टीने ते करीत असलेल्या कार्यवाहीची माहिती सुध्दा अपीलार्थीस दि. २८ मे, २००९ रोजीच्या पत्राने दिलेली आहे. तसेच अपील क्र. ४३८० च्या दि. ३०/५/२००९ रोजीच्या अपीलाच्या सुनावणीच्यावेळी अपीलार्थीच्या सूचनेनुसार दिलेल्या यादीत C.T.S. नंबर सुध्दा नमूद करुन देण्याचे मान्य केले आहे.

महापालिकेने आयोगास विदित केलेल्या वेगवेगळया उपायानी यापुढे फाईल गहाळ होण्याच्या प्रकारांना ब-याच मोठया प्रमाणावर आळा बसेल असे आयोगास वाटते. मात्र ज्या नस्त्या गहाळ झालेल्या आहेत त्याबाबतीतहि एकूण यंत्रणेला जरब बसणेहि आवश्यक आहे. त्यामुळे अशा गहाळ झालेल्या नस्त्यांच्या बाबतीत, महारार्ष्ट पब्लिक रेकॉर्डस ॲक्ट २००५ नुसार कारवाई करावी असेहि निर्देश महापालिका आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

गहाळ नस्त्यांची माहिती गोळा करणे हे जिकीरीचेच काम असते, व अशी यादी आतापर्यंत तयारहि करण्यात आली नव्हती. हे काम प्रथमच करण्यांत आलेले आहे. त्यामुळे शास्तीचे आदेश नाहीत.

---*आदेश*---

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.
अपीलार्थीस दिलेल्या यादीत C.T.S. नंबर नमूद करुन द्यावेत.
या आदेशाची प्रत महापालिका आयुक्त यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ५ जून, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३८७४७/अपील क्रमांक ४११५/०२

श्री.विपूल घरत -----अपीलार्थी
प्रजा फौंडेशन, १९/२०,
बी.एम.सी. स्कूल इमारत, १ ला मजला,
टोपीवाला लेन, मुंबई - ४०० ००७

विरुध्द

१. सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एस/ विभाग इमारत, लाल बहादूर शास्त्री मार्ग,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, भांडूप (पश्चिम)
मुंबई - ४०० ०७८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (मेंटेनन्स)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एस/ विभाग इमारत, लाल बहादूर शास्त्री मार्ग,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, भांडूप (पश्चिम)
मुंबई - ४०० ०७८.

*---विवेचन---*

सुनावणी अगोदरच अपीलार्थी यांनी दि. १२/३/२००९ रोजीच्या पत्राने त्यांना आवश्यक असलेली माहिती समाधानकारकरित्या प्राप्त झालेली आहे व त्यामुळे ते द्वितीय अपील रद्द करु इच्छितात असे त्यांनी कळविलेले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ९ जून, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ /३१७३१ /तक्रार क्रमांक ५८/०८**

**श्री. राजेंद्र धर्माजी चव्हाण ----तक्रारदार**
**मु.पो. देवरुख, वॉर्ड क्र. ३,**
**ता. संगमेश्वर, जिल्हा - रत्नागिरी - ४१५ ८०४.**

**विरुध्द**

**१. .जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी -----उत्तरवादी**
**पंचायत समिती संगमेश्वर (देवरुख)**
**जिल्हा रत्नागिरी - ५१५ ८०४.**

***---विवेचन---***

**आयोगाने दि. ४ जुलै , २००७ रोजी तक्रारदारांस हवी असलेली माहिती देण्यांत यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमेश्वर यांना दिलेले होते. पण माहिती न मिळाल्यामुळे तक्रारदारांनी आयोगाकडे दि. ३०/४/२००८ रोजी तक्रार केली होती. सदर तक्रारीची सुनावणी दि.९ जून, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारकर्ते अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमेश्वर हे उपस्थित होते.**

**तक्रारदारांस जलस्वराज्यांतर्गत सहभागी ग्रामपंचायतीच्या संपन्न झालेल्या सयुक्त सभेचे इतिवृत्त पाहिजे होते. पण तसे इतिवृत्त लिहिले गेलेले नाही. मात्र उपस्थितांची यादी तक्रारदारास देण्यांत आलेली होती. तक्रारदाराना हवी असणारी दुसरी माहिती म्हणजे खेरशेत-कोकरे-नायशी-पेढांबे रस्त्यावरील मो-या बांधणेच्या कामातून सुरक्षा अनामतीची रक्कम कपात करण्यात आली होती त्याबाबत माहिती पाहिजे होती. मात्र उप अभियंता श्रेणी-१ जिल्हा परिषद उप विभाग, देवरुख यांनी ही माहिती दिलेली नाही. तक्रारदारास**

त्यांनी दि. ८/१०/२००७ रोजी त्यांच्या अर्जाबद्दल तक्रारदारांकडेच कांही माहिती सादर करण्याचे पत्र लिहिले होते.

तक्रारदारांच्या अर्जावर उप अभियंता यांनी लिहिलेले पत्र पाहिले असता तक्रारदारांस असे पत्र लिहिण्याचे काहीच कारण दिसून येत नाही. तक्रारदारांनी कामाचे नांव दिलेले आहे व त्या नस्तीवरुन तक्रारदारांस सविस्तरपणे माहिती देता येवू शकली असती. त्यामुळे माहितीच्या अधिकाराची प्रामाणिकपणे अमलबजावणी उप अभियंता यांनी न केल्याचे दिसून येते. याबद्दल उप अभियंता श्रेणी-१, जिल्हा परिषद उप विभाग, देवरुख यांच्यावर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी उप अभियंता श्रेणी-१, जिल्हा परिषद उप विभाग, देवरुख यांच्या १ जुलै २००९ किंवा शक्यच न झाल्यास १ ऑगस्ट, २००९ च्या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा अहवाल आयोगास पाठवावा.

तसेच तक्रारदारांस हवी असणारी माहिती ही १५ दिवसांचे आंत तक्रारदारांना पाठविण्यांत यावी.

<u>*---आदेश---*</u>

तक्रार मान्य करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी वर नमूद केलेली कार्यवाही करावी.

या आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनाहि पाठविण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ९ जून, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९५०/अपील क्रमांक ४४००/०२

श्री.विजय के. मंथेना -----अपीलार्थी
७/३४, हरियानावाला लेन, अब्दुल्ला मेंशन,
कुर्ला (पश्चिम) मुंबई -- ४०० ०७०.

विरुध्द

१. उप विभागीय अधिकारी -----उत्तरवादी
मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत,
९ वा मजला, चेतना कॉलेज जवळ,
बांद्रा (पूर्व) मुंबई -- ४००० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल)
(कुर्ला विभाग ) , टोपीवाला कॉलेज इमारत.
१ ला मजला, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड (पश्चिम)
मुंबई - ४०० ०८०

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २ एप्रिल, २००९
सुनावणीचा दिनांक ९ जून, २००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अर्जातील विषयाची संचिका सापडत नसल्यामुळे माहिती देण्यास होत असलेला उशिर व करीत असलेली कारवाई याबाबत जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेला पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला.

"श्री विजय मंथेना रा. कुर्ला (प) मुंबई ७० यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००४ कलम १९(१) अंतर्गत जन माहिती कार्यालयाकडील दि. २५/९/२००८ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या खुलाश्यामुळे समाधान न झाल्याने दि. १८/१२/२००८ रोजी अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिक्ारी, मुंबई उपविभाग यांचेकडे अपील अर्ज दाखल

केलेला होता. सदर अपीलाचा निर्णय दि. २८/११/२००८ रोजी अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील क्रमांक डिएलएन/मा.अ.अ./टे-४/कावि-१०६३/०९ दि. २८/१/२००९ अन्वये झाला असून अपीलार्थीना उपलब्ध संचिकेतील माहिती विनामूल्य देणेबाबत आदेश दिले आहेत. सदरचे आदेश जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास दि. ७/३/२००९ रोजी प्राप्त झाले आहेत. सदर आदेशान्वये अपीलार्थीना तात्काळ माहिती उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु जन माहिती अधिकारी, सहा. जन माहिती अधिकारी, अनुक्रमे २८ उत्तर पूर्व मुंबई लोकसभा मतदार संघ अंतर्गत १५५- मुलुंड विधानसभा मतदार संघ व घाटकोपर (प) विधानसभा मतदार संघाचे सार्वत्रिक निवडणूक कामी सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा अति. सहा.मतदार निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवडणूकीचे कामामध्ये दि. १६/५/२००९ पर्यंत व्यस्त असल्याने तसेच लोकसभा निवडणूकीचे कामात कार्यालयीन कर्मचारी/ अधिकारी वर्ग देखिल व्यस्त असल्याने अपीलार्थीना मुदतीत माहिती पुरविता आली नाही. प्रस्तुत अपीलाचे कामी अपीलार्थी यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे निवासी नायब तहसिलदार तसेच संबंधित लिपीक यांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. याबाबत त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई स्वतंत्रपणे जिल्ळाधिकारी उपनगर जिल्हा यांचेकडे प्रस्तावित करणेत येत आहे. तथापि, अपीलार्थी यांना सहायक माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार महसूल यांनी दि. २८/५/२००९ रोजी सविस्तर खुलाशाद्वारे कळविले आहे.

श्री. विजय कोडया मंथेना यांनी जन माहिती अधिकारी कार्यालयाकडे श्री. दिगंबर व अशोक महादेव नाईक यांनी हिंदू-बेलदार या जातीचा दाखला मिळणेबाबत सादर केलेल्या कागदपत्राबाबत माहितीचा अधिकार २००५ अन्वये दि. ६/८/२००७ दि. २८/७/२००८ रोजी केलेल्या अर्जान्वये दि. १३/८/२००८ व २४/९/२००८ रोजी संबंधित जातीच्या दाखल्याची मूळ संचिका उपलब्ध होत नसल्याने आवश्यक माहिती पुरविता येत नाही असे कळविले होते. तथापि, अपीलार्थी यांचे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाने केलेल्या खुलाशाने समाधान न झाल्याने उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा तथा अपिलीय

अधिकारी यांचेकडे अपील दाखल केलेल होते. सदर अपीलाचा निर्णय दि. २/११/२००७ रोजी झाल्यानुसार अपीलार्थींना दि. ५/१२/२००७ रोजी लेखी स्वरुपात खुलासा करणेत आलेला आहे. तसेच दि. २५/९/२००८ रोजी देखिल लेखी स्वरुपात कळविण्यात आलेले आहे. तथापि, याकामी अपीलार्थी यांचे समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे दि. १४/११/२००७ रोजी द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदर अपीलाची सुनावणी दि. १४/१०/२००८ रोजी झाली असून निर्णय झालेला आहे. आयोगाने आदेशीत केल्यानुसार संबंधित जात प्रमाणपत्राचे रेकॉर्ड शोधून काढणेबाबत प्रयत्न करण्यात आले. तथापि, संबंधित जातीच्या दाखल्यांच्या मुळ संचिका रेकॉर्डमध्ये उपलब्ध न झाल्याने दि. २१/१०/२००८ रोजी अपीलार्थी यांना लेखी खुलासा करणेत आलेला आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुख्य राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेला आहे. तथापि अपीलार्थी श्री. मंथेना यांनी दि. २२/१२/२००८ च्या खुलाशाने समाधान न झाल्याने पुनश्च अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केलेले होते. या अपीलाचा निर्णय वर नमूद केल्याप्रमाणे दि. २८/१/२००९ रोजी झालेला असून त्या निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास दि. ७/३/२००९ रोजी प्राप्त झालेली आहे. अपीलार्थी यांना अपिलीय अधिकारी यांनी संचिकेतील माहिती विनामूल्या उपलब्ध करुन देणेबाबत आदेशीत केलेले आहे. तथापि, मुळ संचिका उपलब्ध नसल्याने अपीलार्थींना वारंवार जन माहिती अधिकारी कार्यालयाने कळवून देखिल अपीलार्थी सातत्याने माहितीची मागणी करत आहेत. याकामी सादर करण्यात येते की, श्री. माधव नाईक यांना दिलेल्या जातीच्या दाखल्यांची संचिका राज्य माहिती आयोगाचे निर्देशानुसार रेकॉर्ड अभिलेखामध्ये शोध घेवून पुनश्च खात्री करणेत आलेली आहे. तथापि, संचिका उपलब्ध झालेली नाही व तसे अपीलार्थी यांना कळविणेत देखील आलेले आहे. तथापि, प्रस्तुत संचिका उपलब्ध होत नसल्याने तत्कालीन लिपीक सर्वश्री. ईश्वर शिंदे व डि.एस.भंडारी यांना कारणे दाखवा नोटीसा देवून त्याचा खुलासा मागविण्यात आला आहे. संबंधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे प्रस्तावित करणेत येत आहे. तसेच

उप जिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र. २ तथा सक्षम प्राधिकारी यांचेकडे संबंधित जातीच्या दाखल्याबाबत जात पडताळणी समितीकडे अपीलार्थी यांनी सादर केलेल्या दाखल्यांच्या छायांकित प्रतीसह आवश्यक कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत दि. २५/५/२००९ रोजी विनंती करणेत आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी सादर करण्यात येते की, जातीचे प्रमाणपत्र उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिका-यांकडे जात प्रमाणपत्र तयार करणे, वितरीत करणेसाठी स्वतंत्र यंत्रणा नसल्याने प्रशासकीय दृष्टीकोनातून संबंधित तहसिल कार्यालयाकडे अर्ज स्वीकारले जातात व सक्षम अधिका-यांची स्वाक्षरी झाल्यानंतर तहसिल कार्यालयाकडून वितरणाची कार्यवाही केली जाते. जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अथवा सबळ पुराव्याअभावी नाकारण्याचे अधिकार उपजिल्हाधिकारी यांच्याकडे असल्याने प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाहीस्तव उपजिल्हाधिकारी यांजकडे अहवाल सादर केलेला आहे. यास्तव तहसिल स्तरावरुन तसा वरील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. "

जर संचिका सापडत नसेल तर ज्यांना जात प्रमाणपत्रे दिलेली आहेत त्यांनी दिलेले पुरावे घेवून पुन्हा तहसिलदार कार्यालयात बोलवावे व संचिका पुनर्गठीत करण्याची कार्यवाही करावी व तक्रारदारांस हवी असणारी माहिती देण्यांत यावी.

विलंबाबद्दलचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी वरीलप्रमाणे कार्यवाही ४० दिवसांत पूर्ण करुन अपीलार्थीस माहिती द्यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ९ जून, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९९४८/अपील क्रमांक ४३९८/०२**

**श्री.विजय के. मंथेना -----अपीलार्थी**
**७/३४, हरियानावाला लेन, अब्दुल्ला मेंशन,**
**कुर्ला (पश्चिम) मुंबई -- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**१. उप विभागीय अधिकारी -----उत्तरवादी**
**मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत,**
**९ वा मजला, चेतना कॉलेज जवळ,**
**बांद्रा (पूर्व) मुंबई -- ४००० ०५१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल)**
**(कुर्ला विभाग ) , टोपीवाला कॉलेज इमारत.**
**१ ला मजला, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड (पश्चिम)**
**मुंबई - ४०० ०८०**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २ एप्रिल, २००९**
**सुनावणीचा दिनांक ९ जून, २००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीच्या अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केलेले आहे.**

**"श्री. विजय के. मंथेना रा. कुर्ला (प) मुंबई ‍= ७० यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. ९/७/२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये खालील मुद्दयांवर माहिती मिळणेबाबत उक्त नियमातील तरतुदीनुसार अर्ज सादर केला होता.**

**१. श्री. राजेश सत्यवान शिंदे यांना दि. २२/८/२००७ रोजी नोंदणी क्र. MSC/SR/SC/K/३८२१/२००७ यांना हिंदू महार म्हणून दाखला देण्यात**

आला व त्याचा भाऊ प्रशांत नारायण शिंदे यांना दि. २२/८/२००७ रोजी नोंदणी क्रमांक MSC/SR/SC/K/३८२०/२००७ अन्वये हिंदू चांभार म्हणून प्रत देण्यात आली याचा खुलासा करावा.

२. वरील दोन्ही भावंडांनी कार्यालयात सादर केलेल्या पुराव्याच्या साक्षांकित प्रती मिळाव्या.

३. जातीचे दाखले कोणत्या नियमाचे किंवा पुस्तक याची प्रत देण्यात यावी.

४. हवी असलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही किंवा देऊ शकत नाही किंवा अभिलेख आपल्या कार्यालयात उपलब्ध होत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार कोणत्या कलमा अंतर्गत देऊ श्ंकत नाही याचे स्पष्टीकरणासह माहिती देणेत यावी.

अपीलार्थी यांना दि. ५/८/२००८ रोजी म्हणजेच मुदतीत जातीचे दाखले मिळण्यासाठी प्राप्त अर्जांची संख्या मोठया प्रमाणावर असल्याने नजर चुकीने श्री. राजेश सत्यवान शिंदे यांना चांभार या जाती ऐवजी महार या जातीचा दाखला निर्गमित करण्यात आलेला आहे असे सहायक माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. तसेच दि. २९/८/२००८ चे पत्रान्वये अपीलार्थी यांना प्रकरणी उपस्थित राहण्यासाठी देखील कळविण्यात आले आहे. तसेच पुनश्च दि. १५/९/२००८ रोजी श्री. मंथेना यांना हजर राहणेबाबत कळविले आहे. अपीलार्थी श्री. मंथेना हे दि. ११/९/२००८ रोजी सहा. माहिती अधिकारी यांची भेट घेऊन चर्चा केलेली आहे. त्यानुसार श्री. राजेश सत्यवान शिंदे यांना देखिल निर्गमित केलेल्या महार या जातीचा दाखला जमा करण्याबाबत कळविले आहे. तथापि, त्यांनी जातीचा दाखला जमा न केल्याने दि. २६/९/२००८ रोजी उप जिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा तथा सक्षम प्राधिकारी यांचेकडे संबंधित मुळ संचिकासह निर्गमित केलेल्या महार या जातीचा दाखला रद्द करण्याकामी प्रस्ताव सादर केला आहे.

अपीलार्थी यांचे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने दि. १८/१२/२००८ रोजी उपविभागीय अधिकारी तथा अपिलीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपील अर्ज

दाखल केला होता.   सदर अपीलाचा निर्णय दि. २८/१/२००९ रोजी झालेला आहे.  व अपीलार्थी यांना दि. ९/७/२००८ च्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत करण्यात आले आहे.   सदरचे आदेश जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास दि. ७/३/२००९ रोजी प्राप्त झाले आहेत.   निवासी नायब तहसिलदार तसेच सहा. माहिती अधिकारी यांना आदेशानुसार त्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याच्या लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.   जन माहिती अधिकारी तसेच सहा. माहिती अधिकारी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सहा.मतदान नोंदणी अधिकारी तथा अतिरिक्त सहा.मतदार निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तसेच सर्व कार्यालयीन कर्मचारी देखील निवडणूकीचे कामकाजात दि. १६/५/२००९ पर्यंत व्यस्त असल्याने अपीलार्थी यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.   तथापि, अपीलार्थी यांना दि. २८/५/२००९ रोजी आवश्यक माहिती लेखी स्वरुपात पुरविण्यात आलेली आहे.  तसेच राजेश सत्यवान शिंदे यांचा हिंदू महार या जातीचा दाखला रद्द करण्याबाबत उपजिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा हयांचेकडे दि. २५/५/२००९ रोजी पुनश्च पाठपुरावा करण्यात आला आहे.   जातीचे दाखले निर्गमित करण्याचे अधिकार उपजिल्हाधिकारी यांना असल्याने सदरचा प्रस्ताव त्यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. अपीलार्थी यांना माहिती पुरविण्यात आल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये ही विनंती.  "

माहिती देण्यास झालेल्या उशिराबद्दलचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थीस माहिती दिली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ९ जून, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/तक्रार क्रमांक २५१/०९,२९७, २९४,२९५,२९९,३००,३०१,३०२,३०४,३०५,३०६,३०७,३०८,३०९,३१०,३११, ३१२,३१३,३१४,३१५,३१६,३१७,३१८,३१९,३२०,३२१,३२२,३२३,३२४,३२५, ३२६,३२७,३७१,३४२,३६६,३६७. एकूण तक्रारी -- ३८**

**श्री. एस.एम. देव ----तक्रारदार**
**मे. सुदर्शन इंजिनियरिंगचे भागीदार**
**६०/६, तरुण भारत सोसायटी,**
**सहकार रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०९९.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता -----उत्तरवादी**
**महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ,**
**मुख्य अभियंता यांचे कार्यालय, अंधेरी (पूर्व)**
**मुंबई - ४०० ०९९.**
**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ,**
**मुख्य अभियंता यांचे कार्यालय, अंधेरी (पूर्व)**
**मुंबई - ४०० ०९९.**

***---विवेचन---***

श्रीयुत एस.एम. देव यांनी आयोगाकडे दि. ९/२/२००९, २४/३/२००९, ३०/३/२००९ व १३/५/२००९ असे एकूण चार तक्रार अर्ज सादर केलेले आहेत. तसेच त्याआधिही जवळपास ३४ तक्रार अर्ज पाठविले आहेत. या तक्रार अर्जांची सुनावणी दि. ८ जून, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारकर्ते , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

याअगोदरहि या आयोगाने तक्रारदारांची कांही अपीले ऐकलेली आहेत व तक्रारदारांचे समाधान करण्याच्या दृष्टीने तक्रारदार सर्व नस्त्याहि पाहू शकतील असे आदेश दिलेले आहेत. माहितीच्या अधिकारात जशी कागदपत्रे असतील त्या कागदपत्रांच्या प्रती तक्रारदारांस मिळू शकतात व पूर्णपणे समाधान करुन घ्यायचे असेल तर नस्त्यांचे इन्स्पेक्शन करुन हव्या त्या कागदपत्रांच्या प्रती घेणे हा त्यावरचा उपाय असतो. त्या दृष्टीने दि. २५ जून, २००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी श्री. देव यांच्या विषयासंदर्भातील सर्व कागदपत्रे एकत्रित स्वरुपात एम.आय.डी.सी. कार्यालयात मागवून ठेवावीत व तक्रारदारांना या नस्त्यांचे अवलोकन करुन त्यांना ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्या त्यांना देण्यात याव्यात.

तक्रारदारांची अशीहि तक्रार होती की एम.आय.डी.सी यांनी कलम ४ चे पालन योग्य प्रकारे केले नाही. आयोगाने ही बाब तेव्हाच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणली असता ११ फेब्रूवारी, २००८ रोजीच्या पत्राने त्यांनी स्वतः तक्रारदारांस त्यांच्या वेबसाईट www.midcindia.org. यावर सर्व माहिती उपलब्ध करुन दिली आहे व संबंधित जन माहिती अधिकारी तक्रारदारांस हवी असलेली माहिती सत्वर उपलब्ध करुन देतील असेहि त्यांनी कळविले आहे. प्रत्येक कॉन्ट्रॅक्टचे प्रकरण अर्थातच वेबसाईटवर असण्याचे कारण नाही. तक्रारदारांची सततची तक्रार एम.आय.डी.सी. ने त्यांच्या कॉन्ट्रॅक्टच्या काही अटी व शर्ती पाळल्या नाहीत अशी असते. पण त्याबाबत तक्रारदारांनी संबंधित उचित प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य राहिल.

---आदेश--

सर्व तक्रारी निकाली काढण्यात येत आहेत.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. १० जून, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/तक्रार क्रमांक ३२८/०२**

**श्री. जयंतीलाल व्ही. वोरा ----तक्रारदार**
**ब्लॉक नं. ४, २ रा मजला, मेघदूत बिल्डींग,**
**२८३ फलॅक रोड, किकाभाई हॉस्पीटल समोर,**
**गांधी मार्केट जवळ, किंग सर्कल, सायन (पूर्व)**
**मुंबई - ४०० ०२२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, वरळी, मुंबई १८.**

**२. जन माहिती अधिकारी**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, वरळी, मुंबई १८.**

***---विवेचन---***

श्री. जयंतीलाल व्ही. वोरा यांनी आयोगाकडे वर्धमान स्थानकवासी, जैन श्रावक संघ, मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्टनुसार काम करत नाही व त्यांच्याविरुध्द कारवाई करावी असा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियमानुसार आयोगाकडे केला होता. हा अर्ज दि. ११/१२/२००८ रोजी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या अर्जावर काही कारवाई न झाल्यामुळे तक्रारदार यांनी दि. २४/२/२००९ रोजी आयोगाकडे तक्रार

केली आहे.   या तक्रारीची सुनावणी दि. १९ मे, २००९ रोजी घेण्यांत आली.   त्यावेळेला तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदारांना श्री. वर्धमान स्थानकवासी , जैन श्रावक संघाची जी चौकशी करण्यात आली त्या चौकशी अहवालाची प्रत याअगोदरच देण्यात आलेली आहे.   पण धर्मादाय आयुक्त यांनी दि. २८/२/२००७ रोजीचे आदेश दिलेले आहेत त्यानुसार संस्थेस नोटीस काढण्यात आलेली आहे.   पण त्यापुढील कारवाई झालेली दिसत नाही.   त्यामुळे संस्थेविरुध्द करीत असलेल्या कारवाईच्या नोटीसीची प्रत व सद्यःस्थितीची माहिती त्वरित तक्रारदारांस देण्यांत यावी.

तक्रारदारांचा अर्ज हा धर्मादाय आयुक्त कार्यालय यांनी माहितीची अधिकारी सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालयास दि. २६/१२/२००८ रोजी पाठविला.   मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्यावर अधिनियमाच्या कलम १८ ची चौकशी नोटीस बजावल्यानंतर माहिती दिलेली आहे.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले आहे.

"   श्री. जयंतीलाल व्ही. वोरा यांनी न्यास नोंदणी कार्यालय, मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार २००५ अन्वये श्री. माटूंगा श्वेतांबर स्थानकवासी जैन संघ या न्यासाची कोणत्याही प्रकारची माहिती मागितली नाही किंवा तक्रार अर्जही केलेला नाही.  परंतु संदर्भित न्यासाच्या विरुध्द श्री. प्रदिप वोरा व रायसी प्रेमजी गाला यांनी मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दि. १६/८/२००५ च्या तक्रार अर्जानुसार कार्यालयीन निरीक्षक यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत व विश्वस्तांना पाठविलेल्या कारणे दाखवा नोटीस न्यास नोंदणी अधिनियम १९५० च्या कलम ३७ व ६७ अन्वये पाठविलेल्या कारणे दाखवा नोटीसांची प्रत अवलोकनार्थ या निवेदनासोबत सविनय सादर करीत आहे. "

विलंबाचे कारण जन माहिती अधिकारी यांचेकडे असलेला तुटपुंजा स्टाफ व मोठया प्रमाणात अर्जाची आवक हे नेहमीच सांगण्यांत येते.  हे कारण काही अंशी खरे असेलहि

पण जन माहिती अधिका-यांनी शक्य तितक्या लवकर माहिती देण्याच्या दृष्टीनेहि कांही प्रयत्न केलेले दिसून आले नाही. तसेच तक्रारदारांचा अर्ज किंचीत दोषपूर्ण (Defective) असल्याने कोणतीही माहिती मागितली नाही वा तक्रार अर्जहि केला नाही असे जे म्हणणे आहे ते सयुक्तिक नाही. तक्रारदारांचा या आयोगाच्या कार्यालयाकडून धर्मादाय आयुक्तांमार्फत पाठविलेला अर्ज हा ( त्यावर त्यांनी **Format for obtaining Information under RTI Act 2005 under Sec.18** असे लिहिले असले तरी ) तो कलम ६ खालील अर्ज म्हणूनच धरावयास पाहिजे होता.

या सर्व बाबी लक्षात घेता पूर्ण विलबाची शास्ती न लावता फक्त १० दिवसांच्या विलंबासाठी रु. २,५००/- इतकी नाममात्र शास्ती जन माहिती अधिका-यांवर लादण्यात येत आहे. ही शास्ती धर्मादाय आयुकत कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्या १ जुलै २००९ किंवा १ ऑगस्ट २००९ महिन्याच्या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास १५ जुलै, २००९ किंवा १५ ऑगस्ट, २००९ पर्यंत पाठवावा.

---आदेश---

तक्रार मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ११ जून, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३६६३६/अपील क्रमांक ३८४०/०२

श्री. नविन एस. परब ----अपीलार्थी
१ ला मजला, मुळगांवकर इमारत,
७, टोपीवाला लेन, लॅमिंटन रोड,
मुंबई - ४०० ००७.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त परि-२ -----उत्तरवादी
दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,
सर जे.जे. मार्ग, नागपाडा, मुंबई -- ४०० ००८

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,
सर जे.जे. मार्ग, नागपाडा, मुंबई -- ४०० ००८

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. नविन एम. परब यांनी दि. १७/११/२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. सदर अपीलाची सुनावणी मुंबई येथील आयोगाच्या कार्यालयात दि. २४/२/२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी दि. २९/९/२००६ च्या अर्जान्वये सहायक पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस. नाटे, डॉ. दा.भ. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांच्या विरुध्द तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती मिळविण्यासाठी माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ नुसार दि. १/२/२००८ रोजी जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक कार्यालय यांच्याकडे अर्ज केला. त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांच्याकडे आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी पाठविल्याचे अपीलार्थींना दि. ७/३/२००८ च्या पत्रान्वये कळविले. असे असले तरी मागणी केलेली माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी दि.१७/२/२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस महासंचालकांचे कार्यालय यांच्याकडे प्रथम अपील केले. त्या अनुषंगाने दि. ७/५/२००८ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचेकडे सदर अर्जाच्या निर्गतीबाबत विचारणा करण्याचे तसेच सदर अर्ज त्यांना प्राप्त झाला नसल्यास अर्जाची प्रत पाठविण्याचे व अपीलार्थींना उत्तर देण्याचे सुचविणारे आदेश पारित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. २३/५/२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थींच्या दि. २९/९/२००६ च्या अर्जाची प्रत पोलीस आयुक्त कार्यालयास पाठवून त्वरित कार्यवाही करण्याची विनंती केली. असे असूनहि अपीलार्थींना माहिती न मिळाल्याने दि. १७/११/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगाकडील द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यांत आली. शिवाय आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यावरुन असे दिसते की, अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई शहर यांच्याकडून अपीलार्थींना पाठविलेली नाही. वास्तविक पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस आयुक्त कार्यालयाकडे पत्रव्यवहार करुनही पोलीस आयुक्त कार्यालयाने दखल घेतलेली नाही. तेव्हा जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय यांनी पोलीस आयुक्त कार्यालयाकडे व्यक्तिशः संपर्क साधून हे आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत अपीलार्थींनी मागितलेली माहिती उपलब्ध केली जाईल याची खात्रीपूर्वक अंमलबजावणी करावी. तसेच माहिती देण्यास उशीर कां झाला त्याबद्दल कलम २० अन्वये शास्ती कां लादू नये याचा जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त यांचे कार्यालय यांचा खुलासा ( व हा अर्ज पुढे पोलीस आयुक्त

कार्यालयाने पुढे इतर संबंधित जन माहिती अधिकारी यांना पाठविला असल्यास असे सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे खुलासे ) या आयोगास दि. २० जुलै, २००९ रोजी प्रत्यक्ष येऊन सादर करावा. सबब पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. १२ जून, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३७३९०/अपील क्रमांक ४४०१/०२**

**श्री. शिवानंद आर. अंकोलेकर ----अपीलार्थी**
**अे-८, अेम.आय.डी.सी, फ्लॅटेड फॅक्टरी,**
**अेल.बी.एस.मार्ग, वागळे इस्टेट,**
**ठाणे (पश्चिम) ४०० ६०४.**

**विरुध्द**

**१. उप सचिव (उ- १४ ) -----उत्तरवादी**
**उद्योग , उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (उ- १४ )**
**उद्योग , उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १२/१२/२००८**
**सुनावणीचा दिनांक ९/६/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींच्या अपीलासंदर्भात दिनांकवार पुढीलप्रमाणे खुलासा जन माहिती अधिकारी यांना केला.**

| अ.क्र | दिनांक | |
|---|---|---|
| १ | २६/५/२००८ | श्री.अंकोलेकर यांचा अर्ज टपालातून जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला. या अर्जाच्या अनुषंगाने संबंधित कागदपत्रांची तपासणी केली असता त्यामध्ये श्री.अंकोलेकर यांनी यापूर्वी माहितीचा अधिकार कलम १९(१) अन्वये अपिलीय |

| | | |
|---|---|---|
| | | अधिकारी तथा उप सचिव यांच्या कडे दि. ३१/१२/२००७ रोजी केलेल्या अपीलासंदर्भातील (नस्तीवर उपलब्ध कागदपत्रांनुसार सदर अपीलाचा दिनांक ३१/१०/२००८ आहे.) घेतलेल्या निर्णयाबाबत माहितीची विचारणा केल्याचे निदर्शनास आले. |
| २ | १६/६/२००८ | हा अर्ज कार्यासनामध्ये जवळ जवळ २ महिन्याच्या विलंबाने प्राप्त झाला होता, तसेच अर्ज प्राप्त होण्यापूर्वीच याबाबतचे अपील दि. ६/५/२००९ रोजी उप सचिव तथा अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे कार्यासनाच्या निदर्शनास आले. तथापि श्री.अंकोलेकर यांच्या यापूर्वीच्या दि. १९/१०/२००७ च्या अर्जाच्या अनुषंगाने (६.१) अपीलार्थींना आवश्यक माहिती देण्यासाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना दि. २५/१०/२००७ च्या पत्रान्वये (६.२ व ६.२अ) सूचना देण्यात आल्या होत्या. या अनुषंगाने मुख्य अभियंता यांच्या कार्यालयातील कार्यकारी अभियंता, ठाणे यांच्यामार्फत श्री.अंकोलेकर यांना दि. ११/१२/२००७ रोजी (६.३ व ६.४ )आवश्यक माहिती देण्यात आली. तथापि अपीलार्थींनी दि. ३१/१०/२००७ रोजी उप सचिव तथा अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे केलेल्या अपीलासंदर्भात उप सचिव यांनी दि. ५/११/२००७ च्या पत्रान्वये (६.६) आवश्यक माहिती दिली असून सुनावणीसंदर्भात आवश्यक असल्यास दि. १२/११/२००७ रोजी सुनावणीस उपस्थित राहणेबाबत सूचना दिल्या होत्या. या सुनावणीस अपीलार्थी उपस्थित राहिले असून सुनावणी दरम्यान अपीलार्थींनी तक्रार नसल्याबाबत स्पष्ट केल्याने अपिलीय अधिकारी यांनी लेखी औपचारिक निर्णय पत्र जाहिर केले नाही. दि. २६/५/२००८ रोजी प्राप्त अर्जामध्ये अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे झालेल्या याच अपीलाच्या निर्णयाची मागणी केली असल्याने दि. १६/६/२००८ च्या टिप्पणीन्वये (६) अपीलाच्या निर्णयाबाबत विचारणा केली. अपिलीय प्राधिकारी यांच्या मान्यतेने याबाबत दि. १/७/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. |
| ३ | २४/६/२००८ | अपिलीय प्राधिकारी यांच्या सूचनेनुसार दि. १/७/२००८ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याबाबत अपीलकर्ता श्री.अंकोलेकर यांना नोंदणीकृत टपालाद्वारे सूचना देण्यात आली. |
| ४ | १/७/२००८ | अपीलार्थी सुनावणीसाठी उपस्थित नसल्याने सुनावणी झाली नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५ | ४/७/२००८ | अपीलार्थी यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः दि. १/७/२००८ च्या सुनावणीस अनुपस्थित राहिल्या बाबतचे लेखी स्पष्टीकरण दिले. यावेळी त्यांनी केलेल्या विनंतीनुसार पुन्हा दि. ११/७/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. |
| ६ | ११/७/२००८ | सुनावणीस अपीलार्थी श्री. अंकोलेकर तसेच प्रतिवादी म्हणून जन माहिती अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीमध्ये श्री. अंकोलेकर यांनी माहितीचा अधिकार अन्वये केलेल्या अर्जासंदर्भात तसेच अपीलासंदर्भात आवश्यक स्पष्टीकरण देण्यात आले. तसेच त्यांना कार्यासनाकडे असलेली माहिती तसेच अर्ज विलंबाने प्राप्त झाल्याबाबतची माहितीही देण्यात आली. अपिलीय प्राधिकारी यांच्यासमोर सदर माहितीने समाधान झाले असे अपीलार्थींनी स्पष्ट केल्यानंतर अपिलीय प्राधिकारी यांनी सदर अपील निकाली काढले. |

सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती व मार्गदर्शन दिलेले आहे. अपीलार्थींच्या माहितीची निकड भागण्याच्या दृष्टीने राज्य सरकारकडे कुठचेहि कागदपत्र नाहीत व अेम.आय.डी.सी. कडूनच माहिती घ्यावी लागेल हे पुन्हा एकदा अपीलार्थीस स्पष्ट करण्यांत आलेले आहे ते योग्यच आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक. १२ जून, २००९**

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००८/३७२६७/अपील क्र. ३९१२/०२

श्री. विनोद घोलप, ------ अपीलकर्ता
पोस्ट बॉक्स नं. १७६१०,
मालाड (प), मुंबई - ४०००६४

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त, ------ उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगर पालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदार वाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड (प), मुंबई - ४०००६४

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ. व का.)
बृहन्मुंबई महानगर पालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदार वाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड (प), मुंबई - ४०००६४

वि वे च न

श्री. विनोद घोलप यांनी दि. ०८.०७.२००८ रोजी माहीतीच्या अर्जान्वये बी. सी. सी. सी. सूट क्र. १५४३/ २००५ श्री. मुकेश मेहता, प्रयास बंगला, प्लॉट नं. १०१, हिस्सा नं. २३ बाबतची माहिती विचारली होती. सदर माहितीच्या अर्जास विहीत मुदतीत उत्तर मिळाले नाही त्यामुळे व्यथित होवून त्यांनी दि. २७.०८.२००८ रोजी जन माहिती अधिका-यांच्या विरू ध्द सहा. आयुक्त यांच्याकडे कलम १९(१) खाली प्रथम अपील दाखल केले होते.

प्रथम अपिलाची सुनाव णी आयोजित कर ण्यात येवून त्यावर दि. ०८.१०.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. या आदेशामध्ये विचारणा केलेली माहिती सात

**दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात आले. तथापि, सदर माहिती प्राप्त न झाल्याने श्री. विनोद घोलप यांनी कलम १९(३) खाली राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी द्वितीय अपिल दाखल केले. या अपिलाची सुनाव णी दि. ०५.०३.२००९ रोजी घेण्यात आली. सदर सुनावणी साठी अपिलार्थी श्री. घोलप तसेच जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते.**

**सुनावणी दरम्यान माहितीशी संबंधीत फाईल मिळत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगीतले असता, सदर फाईलचा जारीने शोध घेण्याचे निर्देश देण्यात आलेत.**

**दि. १२ जून २००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या कार्यालयात उपस्थित राहून असे निवेदन केले की, सदरील नस्तीतील कागदपत्र हे कोर्टामध्ये होते. (ज्याचा उल्लेख अपीलार्थींच्या अर्जात सुध्दा आहे. ) पण आता केसचा निकाल लागला असल्यामुळे हे कागदपत्र आता उपलब्ध झालेले आहेत.**

**अपीलार्थी यांनी त्यांचे अर्जात माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार असे लिहिले असल्यामुळे अपीलार्थींना दुरध्वनीवरुन संपर्क साधून मंगळवार दि. १६ जून, २००९ रोजी माहिती घेऊन जाण्यास सांगावे व त्यांना माहिती विनामूल्य देण्यात यावी.**

***<u>आ दे श</u>***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १२ जून, २००९

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००८/३८२५७/अपील क्र. ४४३१/०२**

**श्री. नामदेव काशिनाथ कांबळे ------ अपीलकर्ता**
**रामेश्वर चाळ कमिटी, युनिट नं. १५५९,**
**संदेश नगर, बैलबाजार, कुर्ला (पश्चिम)**
**कुर्ला- अंधेरी रोड, मुंबई - ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त, ------ उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, एस विभाग इमारत,**
**लाल बहादुरे शास्त्री मार्ग, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,**
**भांडुप (पश्चिम) मुंबई -- ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (परिरक्षण)**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, एस विभाग इमारत,**
**लाल बहादुरे शास्त्री मार्ग, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,**
**भांडुप (पश्चिम) मुंबई -- ४०० ०७८**

**वि वे च न**

**श्रीयुत नामदेव काशिनाथ कांबळे यांच्या दि. ३१ जानेवारी २००९ रोजीच्या अपीलाची सुनावणी दि. १९/६/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थीस सन २००६-०७ व २००७-०८ च्या कामाची माहिती व वर्क ऑर्डरच्या प्रती पाहिजे होत्या. ही माहिती अपीलार्थीस दिलेली आहे वा देवू**

**केलेली आहे. मात्र यातील बरीचशी माहिती ही इंग्रजीमध्ये आहे. अपीलार्थींचे म्हणणे असे आहे की सदरची माहिती त्यांना मराठीमध्ये देण्यांत यावी.**

**माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये माहिती जशी असेल तशी ती छायांकित प्रतींच्या स्वरुपात द्यावयाची असते. त्यामुळे मुळ माहिती जर इंग्रजीमध्ये असेल तर त्याची प्रतही इंग्रजीमध्येच मिळेल. अर्ज व अपील याबाबतीत सर्व माहिती व आदेश हे मराठीतूनच काढण्यात आलेले दिसून आले. जर वर्कऑर्डर सारखे आदेश हे मुळातच मराठीत असावे असे अपीलार्थींचे म्हणणे असेल तर तशी सूचना/तक्रार महापालिका आयुक्तांकडे करावी.**

***---आदेश----***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १९ जून, २००९

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००८/३४४७६-अ/अपील क्र. ४४३३/०२**
**क्र. मुमाआ-२००८/३४४७६/अपील क्र. ४४३४/०२**
**क्र. मुमाआ-२००८/३९९१९/अपील क्र. ४४३५/०२**

**श्री. रणजीतराय भगवानजी देसाई ------ अपीलकर्ता**
**५०/३०३, गणेश सदन, टिळक नगर-३,**
**एम.जी.रोड समोर, गोरेगांव (पश्चिम)**
**मुंबई - ४०० ०६२.**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त(शिक्षण) ------ उत्तरवादी**
**३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, परेल,**
**मुंबई - ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, प्राथमिक शिक्षण विभाग कार्यालय,**
**हिंदू कॉलनी, दादर, मुंबई - ४०० ०१४.**

**<u>वि वे च न</u>**

यातील दोन अपीले दि. ३/९/२००८ रोजीचे तर तिसरे अपील दि. १५/४/२००९ रोजी सादर करण्यांत आलेले आहे. या तिन्ही अपीलांची सुनावणी दि. १९ जून, २००९ रोजी घेण्यांत आली, त्यावेळेस अपीलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी हे महापालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. त्यांना निलंबित करुन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली होती. मात्र ते चौकशीत निर्दोष सुटले होते. त्यामुळे त्यांच्या मनामध्ये अन्याय झाल्याची भावना आहे व विनाकारण मानसिक त्रास सहन करावा लागला असे त्यांना वाटते. त्यामुळे अनेक अर्ज त्यांनी माहितीच्या अधिकारामध्ये दिलेले आहेत. याअगोदरहि आयोगाने त्यांच्या एका अपीलावर निर्णय देवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यांनी मागितलेल्या माहितीमध्ये जनहिताचा संबंध तसा दुरान्वयानेच येतो.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीचे वेगवेगळे अर्ज याबाबत महापालिकेने केलेली कारवाई याबाबतीत पुढीलप्रमाणे निवेदन उप आयुक्त (शिक्षण) यांनी दिलेले आहे.

"श्री. रणजीतराय देसाई, सेवानिवृत्त चित्रकला शिक्षक म.न.पा. शिक्षण विभाग यांना त्यांनी वेळोपवेळी सादर केलेल्या माहिती अधिकारांतर्गत अर्जाच्या अनुषंगाने त्यांना प्रशासकीय अधिकारी (शाळा) एच/पूर्व विभाग तसेच शिक्षण खाते यांच्या स्तरावर वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच याआधी श्री. एस.एस.शिंदे. तत्कालीन सह आयुक्त (शिक्षण) आणि डॉ. एस.एस. कुडाळकर ,तत्कालीन उप आयुक्त (शिक्षण ) व निम्नस्वाक्षरीकार उप आयुक्त (शिक्षण ) व अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर श्री. देसाई यांना वेळोवेळी त्यांच्या अपील अर्जाच्या अनुषंगाने सुनावणी देऊन यथायोग्य आदेश पारित केलेले आहेत.

याबाबत असे नमूद करण्यात येते की, श्री. देसाई त्यांचे अपील त्याच विषयावर वारंवार करतात. मात्र सुनावणीस उपस्थित राहात नाहीत. परंतु अपिलीय अधिका-यांनी अद्यापपर्यंत त्यांच्या अपील अर्जाची दखल घेऊन शिक्षण विभागाच्या संबंधित कर्मचा-यांना सुनावणीस बोलावून सुनावणी घेऊन यथायोग्य आदेश पारित केलेले आहेत. तसेच असेहि निदर्शनास आले आहे की, श्री. देसाई यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने त्यांना कळवूनसुध्दा माहिती प्राप्त करण्याकरीता त्यांनी शिक्षण खात्याच्या संबंधित अधिका-यांशी/ कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही. म्हणून दि. ६/१०/०८ च्या सुनावणीच्या इतिवृत्तात याची विशेष करुन नोंद घेण्यात आलेली आहे,

**प्रशासकीय अधिकारी (शाळा)एच/पूर्व विभाग यांच्या अहवालावरुन असे दिसते की, तद्नंतर श्री. देसाई यांनी स्वतः कार्यालयात हजर राहून अभिलेखाची छाननी करुन त्यांना आवश्यक असलेल्या अभिलेखाच्या प्रती स्वीकारलेल्या आहेत.**

**अद्यापपर्यंत श्री. देसाई यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती लक्षात घेता त्यांनी पुनश्च द्वितीय अपील करणे याद्वारे म.न.पा. प्रशासनास विनाकारण वेठीस धरणे ही श्री. देसाई यांची धारणा स्पष्ट होत आहे. श्री. देसाई यांच्यामार्फत माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी इत्यादी यांच्याकडे वारंवार त्याच विषयांवर अर्ज करुन म.न.पा. प्रशासनाच्या वेळेचा अपव्यय होत आहे. तरी श्री. देसाई यांचे प्रस्तुत प्रकरण अंतिमतः निकाली काढण्याची विनंती याद्वारे करण्यात येत आहे. "**

**अपीलार्थीनी अभिलेखांची पाहणी करुन आवश्यक त्या अभिलेखाच्या प्रतीही स्वीकारल्या आहेत. त्यामुळे माहिती देण्याच्या बाबतीत कसुर झालेला दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.**

***---आदेश---***

**तिन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**

( डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १९ जून, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर
माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल
झालेले अपील

क्र. मुमाआ-२००८/३८३३७/अपील क्र.४३३२/०२

श्री.बिपीन शंकर राऊत ------ अपीलकर्ता
डी- २१४, श्रीपाल स्टर को.ऑप.हौ.सो.
दत्त मंदिर रोड, अेम.बी. इस्टेट, विरार (पश्चिम)
जिल्हा ठाणे.

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त ------ उत्तरवादी
(कोकण विभाग )
अप्पर कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई - ४०० ०३४.

जन माहिती अधिकारी तथा सरकार कामगार अधिकारी
(कोकण विभाग )
अप्पर कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई - ४०० ०३४.

वि वे च न

श्रीयुत बिपीन शंकर राऊत यांनी दि. २८/१/२००९ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. १९ जून, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांनी आप-आपली निवेदने आयोगास सादर केलेली आहेत. यासंदर्भात अपिलीय अधिका-यांनी जे निवेदन दिलेले आहे त्यावरुन संपूर्ण केसच्या सद्यःस्थितीवर प्रकाश पडतो तो पुढीलप्रमाणे-

"अपीलार्थी श्री. बिपीन शंकर राऊत यांनी मे. गोदरेज ॲन्ड बॉईस मॅन्यू.कं.लि. मुंबई ७९ या आस्थापनेस लागू असलेल्या स्थायी आदेशाच्या प्रती प्रमाणित करणेकरिता केलेली कार्यवाही व इतर माहिती मिळणेबाबत कामगार आयुक्त कार्यालयाकडे उक्त अधिनियमान्वये सादर केलेला अर्ज त्यांचे कार्यालयास दि. १३/९/०८ रोजी प्राप्त झाला. सदर माहितीचे कार्यक्षेत्र कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर पूर्व , मुंबई यांचे असल्याने त्यांच्याकडून माहिती मागविण्यात आली होती.

त्या अनुषंगाने कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर पूर्व यांनी कळविले की, अपीलार्थीनी मे. गोदरेज ॲन्ड बॉई ज मॅन्यु.कं.लि. मुंबई या आस्थापनेच्या स्थायी आदेशाच्या प्रमाणित प्रतींची मागणी केली आहे. ज्या आस्थापनेस हा कायदा लागू असतो त्या आस्थापना त्यांचे स्थायी आदेश प्रमाणित करुन घेतात व त्यांच्या प्रमाणित प्रती संबंधित व्यवस्थापन व कामगार संघटना यांना दिल्या जातात. स्थायी आदेश प्रमाणित करण्याचे काम हे सध्या कामगार उप आयुक्त या प्रवर्गातील प्राधिका-यांमार्फत केले जाते. उपरोक्त कंपनीचे स्थायी आदेश साधारणतः सन १९५५ सालचे असल्यामुळे स्थयी आदेशाची नोंद ज्या रजिस्टरमध्ये घेतली जाते ते रजिस्टर त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच स्थायी आदेशाच्या प्रती देखील त्या कार्यालयात उपलब्ध नाही. तथापि, उपरोक्त माहिती ही संबंधित आस्थापना व तेथील कामगार संघटना यांचेकडे आपणास उपलब्ध होऊ शकेल, त्यानुसार अपीलार्थीस दि. २०/९/२००८ रोजी कळविले होते.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे. तथापि, हवी असलेली व लिहिलेली माहिती सविस्तर, समाधानकारक व दिशाभूल करणारी आहे असे नमूद करुन अपीलार्थीनी दि. ५/१२/२००८ रोजी अपील अर्ज दाखल केला. त्या अनुषंगाने अपीलार्थी, राज्य जन माहिती अधिकारी, कोकण विभाग, मुंबई व माहितीशी संबंधित असलेले कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर पूर्व यांचे प्रतिनिधी यांना दि. १९/१२/२००८, १२/१/२००९ (अर्जदार गैरहजर) व दि. १७/१/२००९ रोजी यांना अपिलीय प्राधिकारी, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर सुनावणीकरिता बोलाविण्यात आले.

सदर सुनावणीचे वेळी अपीलार्थींनी त्यांचे अर्जात नमूद केलेली माहिती मिळणेबाबत विनंती केली. त्याप्रमाणे कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर पूर्व यांनी त्यांचे म्हणणे सादर केले असून अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचे नमूद केले. तथापि, अपीलार्थींची निकड लक्षात घेवून स्थायी आदेशाच्या (१) सन १९६६ - रिप्रिंट १९९४ (२) सन १९६७-रिप्रिंट १९९१ व (३) सन १९६७- रिप्रिंट १९९४ प्रती व्यवस्थपनाकडून उपलब्ध करुन घेवून सादर करण्यात आल्या. याव्यतिरिक्त अन्य माहिती जन माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही. यामुळे अपीलार्थीस हवी असलेली माहिती देता येणे शक्य नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच १०५५ सालची माहिती असल्यामुळे नस्ती अथवा नोंदवही उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे.

सबब, अपीलार्थीनी दाखूाल केलेले अपील अंशतः मान्य करुन कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर पूर्व यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेली वरिलप्रमाणे माहिती व कागदपत्रे अपीलार्थीस पुरविण्यात आलेली आहेत.

वरील निवेदनावरुन असे स्पष्ट होईल की, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस दिलेली माहिती संबंधित शाखेने व्यवस्थापनाकडून प्राप्त करुन घेतलेली आहे व ती त्यांना देण्यांत आलेली आहे. त्यामुळे जी माहिती उपलब्ध झाली तीच अपीलार्थीस पुरविलेली आहे. त्याबाबत सत्यता पडताळणी अथवा इतर मुद्दयांवर अपीलार्थींचे निवेदनाबाबत अपिलीय प्राधिका-यांकडून कार्यवाही होणे अपेक्षित नाही. त्यामुळे दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे किंवा परिपूर्ण नाही असे अपीलार्थींचे म्हणणे योग्य वाटत नाही.

अपीलार्थी श्री. बिपीन राऊत यांनी याच विषयाबाबत दाखल केलेले दुसरे अपील मा. राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, नवी मुंबई यांचेसमोर दि. ४/६/२००९ रोजी सुनावणी झालेली आहे. सदर सुनावणीमध्ये मा. माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ, मुंबई यांनी अंशतः आदेश पारित केले असून त्याची प्रत संदर्भासाठभ सादर करीत आहे. मा. माहिती आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार माहितीशी संबंधित कार्यासनास अपिलीय प्राधिकारी यांनी अवगत केले असून अपीलार्थीस अधिक माहिती देण्याच्या दृष्टीकोनातून

संबंधित कार्यासनाकडून प्रयत्न चालू आहेत. त्याचेकडून माहिती प्राप्त झाल्यास अपीलार्थीस माहिती देता येईल. "

माहिती आयुक्त कोंकण यांच्या आदेशाचे अवलोकन केले असता अपीलार्थीस परिपूर्ण माहिती देण्याच्या दृष्टीने कांही निर्देश जन माहिती अधिका-यांना दिलेले आहेत ते निर्देश या अपीलाचाहि विषय तोच असल्यामुळे याहि अपीलास ते लागू राहतील असे ठरविण्यात येत आहे. त्या आदेशांची अंमलबजावणी झाली की, पर्यायाने याहि आदेशाची अंमलबजावणी आपोआपच होते. त्यामुळे याबाबत करावयाची कार्यवाही एक महिन्याच्या आत संबंधितांनी पूर्ण करावी. या आदेशाची अंमलबजावणी ही कामगार विभागाच्या पध्दतीप्रमाणे अपिलीय अधिका-यांपेक्षाहि वरिष्ठ दर्जाच्या अधिका-यांनी करणे क्रमप्राप्त असल्यास तशी ती त्यांनी करावी व ही बाब अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निदर्शनास आणावी. एकूणच सर्व प्रक्रिया ही एक महिन्याच्या आंत पूर्ण करण्यात यावी. यास्तव पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.
या आदेशाची एक प्रत उप आयुक्त यांनाहि पाठविण्यांत यावी.

( डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १९ जून, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर
माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल
झालेले अपील

क्र. मुमाआ-२००८/२९११९/अपील क्र.४२३४/०२

डॉ. शंकर पोळ ------ अपीलकर्ता
४/५, स्वस्तिक , जे.जे. हॉस्पीटल कँपस,
भायखळा, मुंबई - ४०० ००८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी ------ उत्तरवादी
संचालक आरोग्य सेवा संचालनालय
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पीटल, मुंबई - ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी
संचालक आरोग्य सेवा संचालना लय
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पीटल, मुंबई - ४०० ००१.

वि वे च न

डॉ. शंकर पोळ यांनी दि. १५/१/२००८ रोजी जे द्वितीय अपील सादर केलेले आहे त्यासंदर्भात आयोगाने अंतरिम आदेश दि. १७ सप्टेंबर, २००८ रोजी पारित केले होते व अपीलाची सुनावणी दि. १९ जून, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती आरोग्य सेवा संचालनालयातील दोन विभागापैकी कोणी द्यावी याबाबत ठोस निर्णय लवकर न होवू शकल्यामुळे कालापव्यय झालेला दिसून येतो. त्याचप्रमाणे अपिलीय अधिका-यांनी जे निवेदन दिलेले आहे त्यानुसार तत्कालीन

**मुख्य प्रशासकीय अधिकारी हे दरम्यानच्या कालावधीत सेवानिवृत्तहि झालेले आहेत. अपीलार्थीस हवी असणारी माहिती आता देण्यांत आलेली आहे. अपीलार्थी हे स्वतः आरोग्य सेवा संचालनालयाअंतर्गत कार्यरत असलेले वैद्यक शास्त्रातील शैक्षणिक अर्हताधारक असून त्यास अपंगत्वाबाबतचे सर्व नियम ज्ञात आहेत. याबाबतची कायद्याची प्रत सर्वसामान्य माणूस बाजारातून सहजतेने विकत घेवू शकतो. माहितीच्या अधिकाराखाली त्यासाठी अर्ज करणे आवश्यक नाही. अपीलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२ जून, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर
माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल
झालेले अपील

क्र. मुमाआ-२००८/३८२४६/अपील क्र.४३२७/०२

श्री. मोहम्मद उस्मान शेख ------ अपीलकर्ता
६/५३, अेन.सी.सी. मालवणी
गेट क्र. ७, मालाड (पश्चिम) मुंबई - ६४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त ------ उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्त्र विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)
मुंबई - ४०० ०६४.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का.)
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्त्र विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)
मुंबई - ४०० ०६४.

वि वे च न

अपीलाचा दिनांक ३० जानेवारी, २००९

सुनावणीचा दिनांक १९ जून, २००९

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

याच विषयाच्या संदर्भात श्री. अस्लम रमजान अली शेख , कार्पोरेटर यांच्या पात्रतेविषयीच्या तक्रारी विषयीचे अपील याअगोदरही आयोगाने ऐकलेले होते व त्या अपीलात सहायक आयुक्त यांनी यासंबंधी वरिष्ठांशी सल्ला मसलत करुन अपीलार्थीस

**कळविण्यांत येईल असे प्रथम अपिलीय निर्णयात अपिलीय अधिका-यांनी जे ठरविले होते त्याची अंमलबजावणी करावी असे निर्देश देण्यांत आले होते.**

**आताच्या अपीलाचा विषय सुध्दा तोच आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी स यासंदर्भात इलेक्शन पिटीशन नं. ९१/२००७ हे कोर्टात प्रलंबित आहे व पात्र-अपात्रतेच्या बाबतीत कोर्ट हेच निर्णय घेईल असे कळविलेले आहे. त्यामुळै पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२ जून, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर
माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल
झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/३९१९७/अपील क्र.४३३३/०२

श्री. प्रमोद राजाराम पवार ------ अपीलकर्ता
१२०/बी/६०, राजगड,
एम.यु.टी.पी. , टाटा नगर रोड,
मानखुर्द , मुंबई - ४०० ०४३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरीक्षक ------ उत्तरवादी
उत्तर विभाग, नवीन प्रशासन भवन क्र. २,
२ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,
चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
सरस्वती विद्यालय, २२३/२२४, ११ वा रस्ता,
चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.

वि वे च न

अपीलाचा दिनांक २४ फेब्रूवारी , २००९

सुनावणीचा दिनांक १९ जून, २००९

अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अर्जास अनुसरुन मुख्याध्यापिका , सरस्वती विद्यालय यांनी दि. २३/१२/२००८ रोजी माहिती दिलेली आहे. सुनावणीच्या वेळेला असे निर्देश देण्यांत आले की, आपीलार्थीनी मागितलेल्या माहितीपैकी मुख्याध्यापिका यांची शैक्षणिक अर्हता

**देण्यांत यावी. तसेच स्टाफ ॲप्रूवल मंजूर करुन घेणा-या लिपीकाचे नांव व शैक्षणिक पात्रता या दोन मुद्दयांची माहिति अपीलार्थी यांना देण्यांत यावी.**

**इयत्ता १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांचे पत्रव्यवहाराचे पूर्ण पत्ते न देण्याचा मुख्याध्यापिका यांचा निर्णय योग्यच आहे. तो कायम करण्यात येत आहे.**

**देय माहिती अपीलार्थी यांना ७ दिवसांच्या आत देण्यांत यावी. यास्तव पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

( डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिति आयुक्त

मुंबई
दिनांक : २२ जून, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/३८२५८/अपील क्र.४४३२/०२

श्री. दिपक लक्ष्मीचंद फुरीया ------ अपीलकर्ता
ए/१०५, श्रीयोग को.हौ.सो., तळमजला,
जयराज नगर, अशोक नगर समोर,
वझीरा नाका, ऑफ अेल.टी. रोड,
बोरीवली (पश्चिम) मुंबई - ४०० ०९१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता ------ उत्तरवादी
(इमारत प्रस्ताव) पश्चिम उपनगरे,
डॉ. आंबेडकर मार्केट बिल्डींग, नारायण जोशी क्रॉस रोड,
कांदिवली रेल्वे स्टेशनजवळ, कांदिवली (पश्चिम)
मुंबई - ४०० ०६७

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)
पश्चिम उपनगरे, डॉ. आंबेडकर मार्केट बिल्डींग,
नारायण जोशी क्रॉस रोड,कांदिवली रेल्वे स्टेशनजवळ,
कांदिवली (पश्चिम) मुंबई - ४०० ०६७

वि वे च न

श्रीयुत दिपक फुरीया यांनी आयोगाकडे दि. २७/१/२००९ रोजी जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १९ जून, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात सुनावणीच्या वेळेला पुढीलप्रमाणे निवेदन सादर करण्यांत आले.

"अपीलार्थी श्री. दिपक फुरीया यांनी माहितीच्या अधिकाराखाली त्यांच्या दि. २५/६/०८ च्या अर्जाद्वारे श्रीयोग सोसायटी इमारतीच्या नस्तीविषयी निरिक्षण करुन कागदपत्रांच्या प्रतीची मागणी केली होती. त्यास उत्तर देताना त्यांचे कार्यालयाने दि. २४/७/०८ च्या पत्र क्र. EEBP/370/CRI अन्वये असे कळविले की, सदरहू नस्ती १९८० म्हणजेच २८ वर्षे जुनी असल्यामुळे त्याचा शोध घेऊनही सापडलेली नाही. त्यामुळे आपणांस अपेक्षित असलेली माहिती देण्यास त्यांचे कार्यालय असमर्थ आहे. तद्‌नंतर अपीलार्थीनी दि. १८ ऑगस्ट, २००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्र. अभि (इ.प्र) प.उ.२ हयांच्याकडे अपील सादर केले आणि अपिलीय अधिकारी हयांनी हया संदर्भातील सुनावणी दि. १०/९/२००८ रोजी दुपारी ३-३० वाजता देऊन सुनावणी दरम्यान असे आदेश पारीत केले की, सदर कागदपत्रे शोधण्याच्या दृष्टीने विशेष परिश्रम घ्यावेत व कागदपत्रे सापडल्यावर अपीलार्थीस तसे कळवून उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थीस द्याव्यात. शोध मोहिम सुरु असतानाच त्यांचे कार्यालयाचे दि. १५/९/०८ च्या पत्र क्र. CHE/592/BP(WS)/AR अन्वये त्यांना कार्यालयाने केलेल्या प्रयत्नाबाबत अवगत करण्यात आलेले होते.

तद्‌नंतरही अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी आपल्या ०८/१०/०८ रोजीच्या अर्जाद्वारे प्रथम अपिलीय अधिकारी यांना पुनःश्च अपील केले. हयासंदर्भात दि. १६/११/०८ रोजी अपील सुनावणी घेऊन असे आदेश पारित केले की, पुनःश्च कागदपत्रांचा सखोल शोध घेऊन कागदपत्रे प्राप्त झाल्यावर अपीलार्थीस तसे कळवून अपीलार्थीस उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात.

जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने सदरहू फाईल शोधण्याच्या अनुषंगाने दि. ५/१२/०८ रोजी एका अंतर्गत पत्राद्वारे कार्यालयातील आर विभागातील सर्व इमारत मुकादम हयांना अभिलेख तपासून फाईल शोधण्यासाठी निर्देशित केले होते, परंतु सदर कागदपत्रे शोधली असता सापडली नसल्याचे संबंधित कर्मचा-यांनी कळविले. तद्‌नंतर उप.प्र.अभि.(इ.प्र.)प.उ.२ यांची परिपत्रक काढण्याची मंजूरी प्राप्त करुन तसे परिपत्रक दि. १०/१/२००९ रोजी क्र. DyChe/BP/9726/WS/P&R अन्वये विविध कार्यालयांना

निर्गमित केले. पुनःश्च तपासाअंती दि. ६/२/०९ रोजी फाईल क्र. सीई/४५५३/बीएस २ हया फाईलची काही जीर्ण अवस्थतेत असलेली कागदपत्रे म्हणजेच आयओडी व मंजूरी असलेला आराखडा सापडला.

दरम्यानच्या काळात अपीलार्थीनी त्यांच्या दि. २५/८/०८ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. त्यासंदर्भात राज्य माहिती आयुक्त हयांचे पत्र क्र. रामुआ/२००८/३३९२७/०१ तक्रार क्र. २१०/०९ दि. २७/१/०९ च्या पत्रास अनुसरुन दि. १३/२/०९ रोजी क्र. DyChe/BP/ 10341/WS/P&R अन्वये राज्य माहिती आयुक्त कार्यालय तसेच अपीलार्थी श्री. दिपक फुरीया यांना लिखित स्वरुपात अहवाल देण्यात आला होता.

अपीलार्थीनी उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती न घेतल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाच्या दि. २/३/०९ च्या पत्र क्र. CE/4553/BSII/ AR अन्वये अपीलार्थीस उपलब्ध असलेल्या आयओडी व मंजूरी असलेला आराखडा प्रती रजिस्टर ए.डी. पत्राद्वारे पाठविण्यात आल्या आहेत.

अपीलार्थीनी त्यांच्या दि. ८/१२/०८ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती आयुक्त हयांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा.आयुक्त यांनी दि. २४/२/०९ च्या सुनावणी दरम्यान निर्देशित केल्याप्रमाणे सहायक अभियंता (जलकामे) आर/मध्य विभाग व उप-करसंकलक आर/मध्य यांना त्यांच्या अभिलेखामध्ये सदर इमारतीच्या ओ.सी. प्लॅनची प्रत शोधून जन माहिती अधिकारी कार्यालयात पाठविण्यासंबंधी लेखी कळविण्यात आले होते. (CE/BP/4553/WS/AR दि. ७/३/०९ ) सदर बाबी सहायक अभियंता (जलकामे) आर/मध्य विीाग व उप-करसंकलक आर/मध्य यांच्याकडून प्राप्त झाल्यावर त्याची साक्षांकित प्रत अपीलार्थीस विनाशुल्क पुरविण्यात येईल.

या विषयाच्या अनुषंगाने मुख्य माहिती आयुक्त यांचे दि. १६/३/०९ च्या पत्र क्रमांक मु.मा.आ./२००८/३७७३३/अपील ४०७२/०२ अन्वये दि. २३/३/०९ रोजी दुपारी ३-३० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीस जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता (इ.प्र.) प.उ. उपस्थित होते. सुनावणी दरम्यान मा. आयुक्तांना सदर

प्रकरणाचा संपूर्ण खुलासा करण्यात आला होता. तसेच हया संदर्भातही लेखी अहवाल दि. ९/५/०९ च्या पत्र क्र. DyChe/BP/ 10341/WS/P&R अन्वये सादर करण्यात आलेले आहे.

हया तक्रारीच्या अनुषंगाने असे उद्‌धृत करावेसे वाटते की जन माहिती अधिकारी कार्यालयाने अपीलार्थीस माहिती पुरविण्याच्या उद्देशाने वेळोवेळी विशेष प्रयत्न केले आहेत व माहिती अधिकाराच्या कालमर्यादेत पत्राद्वारे प्राप्त परिस्थितीची कल्पना अपीलार्थीस वेळोवेळी देण्यात आलेली आहे. हयावरुन माहिती न देण्याचा अथवा माहिती लपविण्याचा प्रशासनाचा कोणताही उद्देश नव्हता. प्राप्त परिस्थिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने घेतलेल्या विशेष परिश्रमाची दखल घेऊन आयुक्तांनी हयाबाबत उचित निर्णय घ्यावा ही विनंती.

सविनय सादर.

आपला विश्वासू

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| कार्यकारी अभियंता | उपप्रमुख अभियंता |
| (इमारत प्रस्ताव) आर विभाग | (इमारत प्रस्ताव )प.उ. दोन |
| जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी " |

उपरोक्तानुसार अपीलार्थीस श्रीयोग सोसायटीची आयओडी व मंजूर नकाशाची प्रत प्रयत्नपूर्वक शोध घेऊन देण्यांत आलेली आहे एवढे निष्पन्न यातून निघते. मात्र बिल्डींग कंम्प्लीशन सर्टिफिकेट व ऑक्युपेशन सर्टिफिकेट या बाबतीतील माहिती ही जन माहिती अधिका-यांनी कर निर्धारण विभाग व पाणीपुरवठा विभाग किंवा संबंधित वास्तुविशारद यांचेकडे मिळू शकते का याचा जारीने शोध घेऊन जन माहिती अधिका-यांनी सदरची माहिती अपीलार्थीस एक महिन्याच्या आता देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२ जून, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/२५४३३/अपील क्रमांक २८०३/०२**

**श्रीमती कुसुम सुरेश शहा ----अपीलार्थी**
**सी-४१, गिरी विहार बिल्डींग, ओल्ड अभ्युदय**
**बँकेसमोर, जीवदया लेन, एल.बी.एस.मार्ग,**
**घाटकोपर (पश्चिम) मुंबई - ४०० ०८६.**

**विरुध्द**

**१. अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) -----उत्तरवादी**
**पूर्व उपनगरे यांचे कार्यालय, इंडस्ट्रीयल अॅश्युरन्स बिल्डींग,**
**पहिला मजला, चर्चगेट स्टेशनसमोर,**
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

**२.जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति./निष्का)**
**कुर्ला यांचे कार्यालय, टोपीवाला कॉलेज बिल्डींग,**
**तळमजला, एस.एन.रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई - ८०.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्रीमती कुसुम सुरेश शहा, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये आयोगाकडे दि. ३०/७/२००७ रोजी द्वितीय अपील केले. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, घाटकोपर लिंक रोड मधील शिवराज नगर दयासागर येथील एम.यू.टी.पी. प्रोजेक्ट मधील एकूण कायदेशीर झोपडयांबाबत माहिती द्यावी या अनुषंगाने अपीलार्थींनी पाच मुद्दयांवर माहिती मागितली. परंतु सदर माहिती न मिळाल्याने आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. द्वितीय अपीलाची सुनावणी दि. १/९/२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींनी दि. १५/४/२००६ च्या अर्जान्वये वर उल्लेख केल्याप्रमाणे माहिती मागविली होती. परंतु विहित कालावधीत मागणी केलेली माहिती न मिळाल्याने दि. १०/१०/२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलाची सुनावणी दि. ३०/१०/२००६ रोजी घेतली असता त्यावेळी अपीलार्थी सुनावणीसाठी उपस्थित होत्या. त्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०/१०/२००६ रोजी अपीलार्थींनी मागितलेली माहिती शासकीय नियमानुसार फी घेऊन मुदतीत उपलब्ध करणे. तसेच मुदतीत माहिती न दिल्यास प्रस्तुत प्रकरणी जबाबदार अधिका-यांवर कारवाई केली जाईल याबाबतचे आदेश निर्गमित केले. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. २४/११/२००६ च्या पत्रान्वये अपीलार्थींना असे कळविले की, अपीलार्थींनी मागविलेली माहिती जुन्या कालावधीची असल्याने त्या माहितीचा शोध घेण्याचे काम चालू असून सदर माहिती प्राप्त होताच अपीलार्थींना त्याबाबत कळविण्याची तजविज ठेवली आहे. अंतिमतः अपीलार्थीस दि. २९/७/२००८ रोजी माहिती पुरविल्याचे दिसते.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यांत आली. तसेच उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. माहिती देण्यास उशीर का लावला याबाबत तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा जन माहिती अधिकारी व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे खुलासे आयोगास अंतिमतः दि. ४/६/२००९ रोजी प्राप्त झाले. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांचेहि विलंबाबद्दलचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे पुढीलप्रमाणे -

श्रीमती कुसुम सुरेश शहा यांनी केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) कुर्ला यांचे कार्यालयात दि. १७/४/२००६ रोजी दाखल केला होता. त्यावेळी ते वरील पदावर कार्यरत होते. सदरचा अर्ज आवक रजिस्टरला दि. १७/४/२००६ रोजी नोंद झाला असून (क्र.११२१) तो कार्यवाहीसाठी तत्कालीन अव्वर कारकून श्री. बी.जी.शिंदे यांचेकडे पाठविण्यात आल्याचे कार्यालयीन अभिलेख पहाता दिसून आले.

वास्तवास सदरचा अर्ज हा कार्यवाहीसाठी आवक वहीत नोंद होताच तो संबंधित कर्मया-यांकडे कार्यवाहीसाठी जावयास हवा होता. तथापि, आवक-जावक लिपीक श्रीमती. नाखवा यांनी सदरचा अर्ज श्री. बी.जी.शिंदे यांचेकडे दि. ८/६/२००६ म्हणजेच तब्बल दोन महिन्यांनी पाठविल्याचे दिसून आले आहे. सदरच्या अर्जावर श्री. बी.जी.शिंदे ,अव्वर कारकून यांनी काय कार्यवाही केली याचा आढावा वास्तविक तत्कालीन तहसिलदार श्रीमती. मुरुडकर यांनी घेऊन जन माहिती अधिका-यांचे निदर्शनास आणून देणे गरजेचे होते.

माहे एप्रिल व मे २००६ मध्ये मिठी नदी अंतर्गत बाधित होणा-या झोपडयांच्या निष्कासनाचा कार्यक्रम मुंबई महानगरपालिका व एम.एम.आर.डी.ए. यांचे समवेत आखणेत आला होता, व मे अखेर निष्कासन पूर्ण करणे गरजेचे असलेने जन माहिती अधिका-यांना कार्यालयात नियमित जाणे शक्य होत नव्हते. त्यानंतर सदर अपीलार्थीस माहिती पाठविणे सबंधी तहसिलदार अथवा अव्वर कारकून यांनी माहिती पाठविणेबाबतचे कागदपत्र ठेवले नाहीत. त्यामुळे केवळ जन माहिती अधिका-यांसमोर माहिती न आल्यामुळेच अपीलार्थीस ते देण्याचे राहून गेले आहे. अपीलार्थीस जाणून बुजून माहिती न देण्याचा कुठलाही हेतू नव्हता. माहे एप्रिल २००८ पासून दि. ३/६/२००८ पर्यंत जन माहिती अधिकारी हे प्रकृती कारणास्तव वैद्यकीय रजेवर होते.

कार्यालयीन अभिलेख पाहता अपीलार्थी यांना दि. २९/७/२००८ रोजी माहिती पुरविण्यात आल्याचे समजते.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती ही अंधेरी घाटकोपर जोडरस्त्याबाबत होती. सदरचे रेकॉर्ड हे तेव्हा भटवाडी येथील म्युनिसिपल हॉलमध्ये होते. सदरचा हॉल हा खाली करुन देणेबाबत म्युनिसिपल नगरसेविका तसेच कार्यालयाकडून सतत तगादा येत असल्यामुळे तो हॉल जानेवारी २००६ मध्ये रिकामा करुन तेथील कागदपत्रे चिराग नगर येथे नवीन मिळालेल्या जागेत हलविण्यात आली. वरील जागेत ४९-कुर्ला विधानसभा मतदार संघाचे रेकॉर्ड व मुलुंड कार्यालयातील जोडरस्ता , एस.आर.ए. व इतर कागदपत्रे ही भटवाडी येथून हलवून चिरागनगर येथील जागेत नेण्यात आली. परंतु ४९-कुर्ला

विधानसभा मतदार संघाचे निवडणूक कार्यालयास सदरची जागा अपुरी पडल्यामुळे त्यातील मुलुंड कार्यालयाशी संबंधित असलेले रेकॉर्ड घाटकोपर येथून मुलुंड येथील उपजिल्हाधिकारी कुर्ला कार्यालयात ठेवणेत आले. कार्यालयाची जागा अतिशय अपूरी असून कर्मचा-यांनाही बसण्याची सोय होत नाही याची वारंवार तक्रार मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा व मा. अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे केली. तद्नंतर मुलुंड कार्यालयाच्या हद्दीतच असलेल्या बैठया चाळीतील दोन खोल्या घेऊन काही रेकॉर्ड त्यामध्ये ठेवण्यात आले. अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती ही रेकॉर्ड सतत २-३ ठिकाणी हलवण्यात आल्यामुळे शोधण्यात वेळ लागला. त्यामुळे सदरची माहिती देणेस विलंब झाला आहे. अपीलार्थीस जाणून बुजून माहिती उशिरा देण्याचा कुठलाही हेतू नव्हता.

तसेच जन माहिती अधिकारी यांना मदत करणा-या तहसिलदार श्रीमती मुरुडकर यांचा खुलासा पुढीलप्रमाणे --

तत्कालीन उपजिल्हाधिकारी यांनी वरील संदर्भिय पत्राचा दिलेला खुलासा त्यांनी वाचून पाहिला. त्या वरील कार्यालयात तहसिलदार या पदावर कार्यरत होत्या. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे त्यांना मान्य नाही. कारण तत्कालीन उपजिल्हाधिकारी यांचेकडील महत्वाचे टपाल स्वाक्षरीसाठी कागदपत्रे त्या रोज सायंकाळी घाटकोपर येथील निवडणूक कार्यालयात शिपायामार्फत सादर करीत असत किंवा त्या स्वतः सायंकाळी मुलुंड येथील कार्यालयांत व श्रीयुत बि.जी. शिंदे यांच्या कार्यालयात स्वाक्षरीसाठी वसून सहया करीत असत. त्यांचेकडे माहितीचा अधिकार या विषयाची सुपरव्हिजन दिली होती. त्यामुळे सदरचे कामी त्या स्वतः श्रीमती नाखवा यांचेकडून पेंडींग संदर्भ घेऊन स्वतः तयार करुन उप जिल्हाधिकारी यांचे सहीला ठेवत असत ही बाब उप जिल्हाधिकारी यांना सुध्दा माहिती आहे. सदरचे वरील श्रीमती शहा यांचे प्रकरण (अर्ज) त्यांना न दाखविल्यामुळे राहून गेले असावे अशी त्यांची खात्री आहे.

तसेच श्री. बि.जी.शिंदे, अव्वर कारकून हे सुध्दा जबाबदार व सिनियर अधिकारी होते. त्यांनाही माहितीचा अधिकार ही बाब ठराविक कालावधीत निकाली काढण्याबाबत शासन परिपत्रकानुसार सुचना देण्यांत आल्या होत्या.

तसेच श्रीमती. नाखवा टपाल आवक जावक लिपीक नेहमी गैरहजर रहात होते. त्यावेळी त्यांनी महत्वाचे टपाल कोणाडेही न दाखविता त्यांचेकडेच ठेवत असत व कपाटाच्या चाव्याही त्यांचेकडेच ठेवत असत. याकामी त्यांनी वेळोवेळी श्रीमती.नाखवा यांच्या गैरहजेरीबाबत मा. उपजिल्हाधिकारी यांना समक्ष कल्पना दिली होती. नोटीसा काढल्या होत्या.

तरी सदरची जबाबदारी श्रीमती. नाखवा लिपीका व श्री.बि.जी.शिंदे अव्वर कारकून यांची आहे. तसेच टपाल पहाणे व ते तहसिलदार यांचे निदर्शनास आणून देणे हे काम श्रीमती. पोतनीस नायब तहसिलदार यांनी निदर्शनास आणून दिलेले नाही. सदर कालावधीत मिठी नदी टपाल क्रमांक १ चे कामी त्यांची नेमणूक केली असल्यामुळे व निष्कासनाकामी त्यांना उपजिल्हाधिकारी यांचे ऐवजी त्याना जावे लागत असल्यामुळे त्यांना कार्यालयीन इतर कामात विशेष लक्षत देता आले नाही. उपजिल्हाधिकारी हे स्वत: कार्यालयांत कमी येत असल्यामुळे कार्यालयांतील इतर कामाची जबाबदारी त्यांनाच पार पाडावी लागत असे. तसेच त्यांना मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालयांत त्यांची मा. अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक अजि/अति/निष्का/मुंपुऊ/आस्था-१/१२५/०७ दिनांक २०/३/२००७ अन्वये सेवा वर्ग केल्यामुळे त्या दि. २/६/२००७ पर्यंत कार्यरत होत्या त्यानंतर त्यांची रायगड जिल्हयात बदली झालेली आहे.

अपीलार्थीस माहिती जाणून बुजून न देण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता परंतु कार्यालयीन अपुरा कर्मचारी वर्ग तसेच श्रीमती नाखवा लेखनिक कार्यालयांत वेळोवेळी अनुपस्थितीमुळे सदरची माहिती पाठविण्यांस विलंब झालेला आहे. तरी कृपया त्यांचा वरील खुलासा ग्राहय धरुन सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई न करणेबाबत विनंती आहे.

श्री. बि.जी. शिंदे माजी अव्वल कारकून यांचा खुलासा पुढीलप्रमाणे -

श्रीमती. कुसुम सुरेश शहा यांनी केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) कुर्ला यांचे कार्यालयात अर्ज दि. १७/४/२००६ अन्वये दाखल केला होता. सदर अर्ज कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर वास्तविक

त्वरित दुस-याच दिवशी सदरचा विषय ज्या कर्मचा-याकडे आहे अशा संबंधित कर्मचा-याकडे वर्ग करावयास हवा होता. परंतु कार्यालयीन अभिलेख पहाता तसेच मा. उपजिल्हाधिकारी (अति/निष्का)कुर्ला यांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी पू.उप. यांना दि. ८/९/१००८ रोजी दिलेला खुलासा पाहता सदरचा अर्ज तब्बल दोन महिने आवक-जावक लिपीक श्रीमती.नाखवा यांचेकडे होता असे दिसून येते.

त्यानंतर दि. ८/६/२००६ म्हणजेच दोन महिन्यांनी सदरचा अर्ज त्यांचेकडे पाठविल्याचे नोंदवहीवरुन दिसून येत असल्याचे दिसते. तथापि अर्जा मधील विषय हा घाटकोपर-अंधेरी लिंक रोड मधील बाधीत झोपडयाबाबत असल्यामुळे व हा विषय त्यांच्या कामाशी संबंधित नसल्यामुळे त्यांनी असा अर्ज स्वीकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तसेच माहितीचा अधिकार अंतर्गत कार्यालयात प्राप्त झालेला अर्ज जास्तीत जास्त दोन दिवसात संबंधित कर्मचा-यांकडे मिळणे आवश्यक असल्याने त्यांनी दोन महिन्यांतरचा सदरचा त्यांचेकडे कार्यभार नसलेल्या विषयासंबंधीचा अर्ज घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

ते सध्या मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी येथे सहायक करमणूक कर अधिकारी म्हणून कार्यरत असून तेथे रुजू होण्यापूर्वी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) कुर्ला येथील कार्यालयातून कार्यमुक्त होतेचे वेळी श्री. सानप अ.का. यांना दिलेला चार्ज यादीची छायाप्रत सोबत जोडत आहे. सदर चार्ज यादीमध्ये उपरोक्त अर्जाच्या विषयाचा कार्यभार त्यांच्याकडे नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांचेकडे ४८ नेहरुनगर वि.स.म. संघाच्या अंतर्गत येणा-या फोटोपास वितरीत करण्याचे काम होते. सदरचा विषय हा ४८ नेहरुनगर वि.स. या त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपजिल्हाधिकारी (अति/निष्का)कुर्ला यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जाच्या उत्तरास झालेल्या विलंबात त्यांचा कांहीही संबंध नाही. कार्यालयीन अभिलेख पाहता अपीलार्थी यांना दि. २९/८/२००८ रोजी माहिती पुरविण्याचे आल्याचे समजते. तरी कृपया सदरील खुलाश्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येवू नये ही विनंती.

श्रीमती. नाखवा, लिपिक यांचा खुलासा पुढीलप्रमाणे --

श्रीमती. कुसुम सुरेश शहा यांनी शासनाचा माहितीचा अधिनियम २००५ अन्वये उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) कुर्ला यांचे कार्यालयांत आवक नोंदवहीमध्ये १७/४/२००६ रोजी अर्ज दाखल केलेला दिसून यतो. सदर दिवशी त्यांच्या वडिलांची तब्येत बरी नसल्यामुळे त्या किरकोळ रजेवर होत्या. सदरचा अर्ज त्यांनी स्वीकारलेला नाही. तसेच वडिलांची तब्येत बरी नसल्यामुळे त्यांना वारंवार किरकोळ रजा घ्याव्या लागत होत्या. तसेच उपजिल्हाधिकारी रजेवर असल्यामुळे श्रीमती मुरुडकर (तहसिलदार) सदरचे कार्यालयीन काम पहात होत्या व सर्व कामकाजांवर त्यांची देखरेख होती. पण टपालावर चार ते पाच दिवस कुणाच्याही सहया होत नसल्यामुळे टपाल कोणीच स्वीकारत नव्हते तसेच ते बांधून ठेवावे लागत होते. त्यातच त्यांचे वडिलांची तब्येत कमी जास्त होत असल्याने त्यांचेपण दुर्लक्ष झाले होते.

त्यातच त्यांच्या वडिलांचे दि. १८/५/२००६ रोजी दु:खद निधन झाले. त्यांची माहिती त्यांच्या मिस्टरांनी ऑफिसमध्ये कळविले होती त्यामुळे दि. १८/५/२००६ पासून त्या रजेवर गेल्या. तसेच कार्यालयास पण कळविले होते त्यातच दि. २९/५/२००६ रोजी म्हणजेच दहा ते अकरा दिवसांनी त्यांच्या सासुचे आकस्मितरित्या दु:खद निधन झाले. अशा वेळी त्या त्यांचे माहेरची व सासरची दोन्ही महत्वाच्या व्यक्ती गेल्याने त्यांची मन:स्थिती बरी नव्हती व त्या फारच खचून गेल्या होत्या.

त्यांचे पश्चात त्यांच्या टेबलाचे काम कोणी पाहिले हे त्यांना माहित नाही. तसेच त्या दु:खात असतांना त्यांना कार्यालयातून श्रीमती. मुरुडकर (तहसिलदार ) हयांचा दुरध्वनी आला होता. त्यांना एक माहितीच्या अधिकाराची फाईल सापडत नव्हती. त्यांचे कपाटात पण ती नव्हती. श्रीमती. मुरुडकर यांनी फोन करुन त्यांना कार्यालयात बोलावून घेतले. तशा दु:खात पण येवून त्यांनी ती फाईल श्रीमती. मुरुडकर यांच्या टेबलावरुन शोधून दिली.

तरी एखादया व्यक्तीच्या घरी जर कोणी आकस्मीकरित्या निधन पावले तर त्या व्यक्तीवर केवढा दु:खाचा भारत असतो. तसेच त्यांचे पश्चात जे कार्यालयात त्यांचे काम

ज्या कोणाकडे दिले होते ते व्यवस्थित केलेले दिसून येत नाही व त्याचे खापर जाणून बुजून त्यांच्यावर ठेवण्यांत आले आहे.

त्या जरी कामावर असल्या किंवा रजेवर असल्या तरी टपाई फाईल मधुन महत्वाचे कागदपत्र परस्पर काढून घेतली जातात. तसे त्यांनी त्यांच्या वरिष्ठांच्या निदर्शनास आणूंन दिले होते. वरिष्ठांनी त्या गोष्टीकडे लक्ष दिले नाही. एखादी महत्वाची केसेस असेल किंवा फाईल असेल ती जर परस्पर मधुनच काढली गेली तर ती त्यांना कशी समजणार. तसेच महत्वाचे टपाल गहाळ होणे तसेच काढून घेतल्यामुळे अर्ज किंवा तो टपाल केव्हा आला याचा बोध होत नाही व ते कुठल्या नंबराने गेल्याचा बोध होत नाही. तसेच श्रीमती. कुसुम शहा यांचा अर्ज त्यांनी स्वीकारलेला नाही. तसेच त्या रजेवर असल्याने त्यांनी ता अर्ज श्री. बी.जी. शिंदे (अ.का.) यांच्याकडे दोन महिन्यांनी पाठविला असे म्हणणे चुकीचे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच त्या रजेवर असल्याने त्यांनी ते पत्र कोणी कसा काय पाठविचला याचा काहीच संबंध लागत नाही. तसेच त्यांनी श्री. बी.जी. शिंदे , अ.का. यांना आवक व अंतर्गत टपाल नोंदवही त्यांनी त्यांना दाखविली व त्यांनी तो अर्ज स्वीकारलेला नाही असे त्यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्या खुलाश्यात अनंत अडचणींचा पाढा मांडण्यात आलेला आहे. कांही अडचणी या ख-या आहेत. पण माहितीचा अधिकार अर्जाबाबत जी जागरुकता, तत्परता त्यांनी दाखवावयास पाहिजे होती ती दाखविल्या गेली नाही. नस्ती शोधून काढण्यास व अपीलार्थीस माहिती देण्यास फार मोठा कालावधी (जवळपास २ वर्षे ) गेला आहे. याबद्दल त्यांचेवर कलम २० नुसार शास्तीची कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र मिठी नदीचे रुंदीकरण या सारखे त्यावेळेच अत्याधिक महत्वाचे काम व रेकॉर्ड ठेवण्याची जागा ही वारंवार बदलल्या जाणे या दोन गोष्टी लक्षात घेता त्यांचेवर पूर्ण कालावधीची शास्ती न लादता फक्त रु. १०,०००/- ( रुपये दहा हजार फक्त ) ची शास्ती लादण्यात येत आहे.

तहसिलदार श्रीमती. मुरुडकर यांनी जन माहिती अधिकारी यांची "सहाय्यकाची "

भूमिका योग्य रितीने बजावलेली नाही असे त्यांच्या खुलाश्यावरुन दिसून येते. अर्ज जर आवक रजिस्टरमध्ये नोंदला गेला आहे त्याचे पुढच्या प्रोसेसिंगकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. ते न केल्यामुळे श्रीमती. मुरुडकर यांचेवर रु. २,०००/- (रुपये दोन हजार फकत )ची शास्ती लादण्यात येत आहे.

श्रीमती. नाखवा यांचेवरहि कडक कारवाई होणे आवश्यक होते. पण त्या कालावधीत झालेले दोन अत्यंत जवळच्या नातेवाईकांचे मृत्यु व त्यामुळे उद्‌भवलेली मानसिक परिस्थिती लक्षात घेता त्यांना यापुढे जागरुक राहण्याची समज देण्यात येत आहे.

श्री. बी.जी. शिंदे , अव्वर कारकून यांचा खुलासा लक्षात घेता त्यांना जागरुक राहण्याची समज देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

माहिती पुरविण्यास विलंब होण्यास जबाबदार असलेल्या संबंधितांच्या १ जुलै किंवा फार झाले तर १ ऑगस्ट २००९ रोजी होणा-या पगारातून शास्तीची रक्कम वळती करुन ती शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी, व तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

ही कार्यवाही अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई पूर्व उपनगर यांनी करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २२ जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६२२**

**श्री. नरेंद्र बारकू चौधरी ----अपीलार्थी**
**दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट,**
**तळमजला, महाराणा प्रताप चौक,**
**मनपा समोर, धुळे.**

**विरुध्द**

**१. तालुका कृषि अधिकारी -----उत्तरवादी**
**कृषि विभाग (राज्य) नंदूरबार,**
**जिल्हा नंदुरबार.**

**२.जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी**
**कृषि विभाग (राज्य) नंदूरबार,**
**जिल्हा नंदुरबार.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १९/९/२००८**
**सुनावणीचा दिनांक २५/५/२००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे यांनी दि. १५/५/२००८ च्या अर्जान्वये १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च, २००८ या कालावधीत नाला बंडींग, बंधारे बांधणे आदि कामांवर केलेल्या खर्चाची माहिती मागितली. याचसोबत कामांची यादी, अंदाजपत्रकीय तरतूद, मंजूर रक्क्म, कामाची सद्य:स्थिती , कामावर देखरेख करणा-या अधिका-याचे नांव, इत्यादी अनुषंगिक माहितीची मागणी केली.**

अर्जानुसार पूर्ण माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी दि. २/७//००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावरील निर्णय झालेला नाही. अशा परिस्थितीत अपीलार्थीनी दि. १९/१/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी दाखल केलेल्या अपील अर्जानुसार त्यांना कांही माहिती अप्राप्त आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी त्यांच्या प्रथम अपीलाची दखल घेतलेली नाही. सुनावणीच्या वेळी माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निवेदनानुसार असे दिसून येते की, अपीलार्थींना अपुरी माहिती दिली असून ती सुध्दा विलंबाने दिली आहे.

अपीलार्थीनी मागणी केल्यानुसार त्यांना माहिती विहित मुदतीत द्यावयास हवी होती. त्याचप्रमाणे कागदपत्रांसाठीच्या शुल्काची मागणी मुदतीत करावयास हवी होती असे आयोगाचे मत आहे. माहिती पुरविण्यास विलंब झालेला असल्याने अपीलार्थींना विनाशुल्क माहिती देणे योग्य राहील.

## *---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपीलार्थीस द्यावयाची माहिती ही ८५० पृष्ठे होते. अपीलार्थीनी ही माहिती पहावी व त्यातील जेवढी म्हणून माहिती त्यांना पाहिजे असेल ती अपीलार्थींना या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत विनाशुल्क पुरविण्यात यावी.

फी ची मागणी वेळेत करावयाची असते याचे भान ठेवता अपीलार्थीनी पैसे भरले नाही म्हणून माहिती देता येत नाही अशा चुकीच्या समजूतीत राहून माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ती जन माहिती अधिकारी यांच्या १ ऑगस्ट २००९ रोजी होणा-या

**पगारातून  जिल्हा कृषि अधिकारी यांनी वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व अनुपान अहवाल आयोगास पाठवावा.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक.  २३ जून , २००९**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६०१**

**श्री. युवराज दलाल शिंदे** **----अपीलार्थी**
**आनंद नगर , प्लॉट नं.६,**
**देवपूर, धुळे.**

**विरुध्द**

**१. उप आयुक्त (आस्थापना)** **-----उत्तरवादी**
**आयुक्त कार्यालय, नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्रशा.)**
**उप आयुक्त आस्थापना शाखा,**
**आयुक्त कार्यालय, नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २५/८/२००८**
**सुनावणीचा दिनांक २५/५/२००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

श्री. युवराज दलाल शिंदे ,धुळे यांनी दि. ४/४/२००८ च्या अर्जान्वये एकूण ५ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. यातील मुद्दा क्र. १ ते ३ व ५ बाबतची माहिती अपीलार्थीच्या विभागीय चौकशी प्रकरणाशी संबंधित असल्याने देता येणार नाही असे अपीलार्थींना दि. ३ मे, २००८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. मुद्दा क्र. ४ ची माहिती देण्यास तयारी दर्शवून त्याप्रित्यर्थ रु. २/- शुल्क भरण्यास अपीलार्थींना सांगण्यात आले. यावर व्यथित होऊन अपीलार्थींनी दि. २१/५/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर सुनावणी घेण्यात येऊन दि. ५/६/२००८ रोजी आदेश देण्यांत आले.

यानुसार अपीलार्थीना जन माहिती अधिका-यांनी तात्काळ माहिती पुरवावयाची होती. तथापि, माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी दि. २५/८/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलार्थी विरुध्द विभागीय चौकशी अंतिम टप्प्यात असल्याने त्यांना माहिती दिली नाही. विभागीय चौकशीशी संबंधित नसलेली उर्वरित माहिती अपीलार्थीना दिलेली आहे.

सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपीलार्थीना माहिती पुरविण्यास विलंब झालेला नाही. तसेच विभागीय चौकशीवर विपरित परिणाम होऊ शकणारी संबंधित माहिती न देण्याचा जन माहिती अधिका-यांचा निर्णय योग्य आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २३ जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५२८**

**श्री (डॉ) नानासाहेब महाळुजी गिते ----अपीलार्थी**
**१५, कल्पतरु सहकारी सोसायटी,**
**दसरा मैदान मागे, मालेगांव रोड, धुळे.**

**विरुध्द**

**१. जिल्हाधिकारी -----उत्तरवादी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक**
**महसूल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,**
**नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १५/७/२००८**
**सुनावणीचा दिनांक २६/५/२००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

श्री.(डॉ.) नानासाहेब महाळुजी शिंदे, धुळे यांनी दि. ११/२/२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून राष्ट्रीय विद्या विकास संस्था, साक्री या शैक्षणिक संस्थेस ४००० चौ.मीटर जागा मिळण्याबाबत प्रलंबित असलेल्या प्रकरणाची माहिती मागितली. ही माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १०/४/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी दि. १५/७/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी असे सादर करण्यात आले की, माहितीशी संबंधित संचिकेचा शोध घेण्यात येऊन अपीलार्थीस एक महिन्यात माहिती पुरविण्यात येईल. याचा

**विचार करुन जन माहिती अधिकारी यांना असे निर्देशं देण्यात येतात की, त्यांनी अपीलार्थीना योग्य ती माहिती एक महिन्याच्या आंत पुरवावी.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक. २३ जून , २००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६१४**

**श्री .दिपक माधवराव खैरनार ----अपीलार्थी**
**भिमनगर, साक्री रोड, धुळे,**
**ता. जि. धुळे.**

**विरुध्द**

**१. गट विकास अधिकारी -----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद पंचायत समिती कार्यालय नवापुर,**
**ता. नवापूर, जि. नंदुरबार.**

**२.जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता**
**जिल्हा परिषद पंचायत समिती कार्यालय नवापुर,**
**ता. नवापूर, जि. नंदुरबार.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १९/९/२००८**
**सुनावणीचा दिनांक २६/५/२००९**
**अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

श्री. दिपक माधवराव खैरनार , धुळे यांनी दि. १०/५/२००८ रोजीच्या अर्जान्वये सन २००५ ते २००७ या कालावधीची खालील माहिती मागितली.

नवापूर तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत झालेल्या विकास कामांची नावे, गावाचे नांव, कामाची मुदत, ठेकेदारांची नांवे, कामे मुदतीत पूर्ण न झाल्याची कारणे, कामावर झालेला खर्च, मोजमाप पुस्तिकांची झेरॉक्स, कामावर असलेल्या मजूरांची नांवे, मंजूर प्लान एस्टीमेंटसच्या झेरॉक्स प्रती, गुण नियंत्रणाचा तपासणी अहवाल इत्यादी.

उपरोक्त माहिती न मिळाल्याने अपीलार्थी यांनी दि. १५/७/२००८ रोजी अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. यानंतरही माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. १०/९/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी त्यांना सुनावणीपर्यंतच्या तारखेपर्यंत माहिती न मिळाल्याचे निदर्शनास आणले.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थींना माहिती देण्यास कसूर केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस उपस्थित नसल्याने माहिती न देण्याचे कारण स्पष्ट झाले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना माहिती का पुरविली नाही याचा खुलासा त्यांनी सदर आदेश पारित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा. तसेच १५ दिवसांच्या आत अपीलार्थींनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना माहिती पुरवावी.

## *---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थींना या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माहिती पुरवावी.

अपीलार्थींना विहित मुदतीत माहिती का पुरविण्यात आली नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादण्याची कारवाई कां करु नये याचा खुलासा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २३ जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५७५**

**श्री. रोशनलाल ब्रिजलाल जयस्वाल ----अपीलार्थी**
**रा-२/अ, सहजीवन नगर, शासकीय दुग्ध डेअरी रोड,**
**रेल्वे क्रॉसिंग जवळ, धुळे.**

**विरुध्द**

**१. मुख्याधिकारी -----उत्तरवादी**
**नवापूर नगरपरिषद, जिल्हा धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी**
**नवापूर नगरपरिषद, जिल्हा धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ९/१/२००९**
**सुनावणीचा दिनांक २६/५/२००९**
**अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

श्री. रोशनलाल ब्रिजलाल जयस्वाल, धुळे यांनी त्यांच्या दि. १२/७/२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

श्रीमती चौरसाबाई मोहनलाल यांचे घर क्र. ७२४ गाळे ३ हे ग्रामपंचायत वेळेचा ठराव क्र.४ /२ (३८) दि. २९/१०/१९८२ रोजी सादर केलेला अर्ज व वाटणी पत्र दाखल केलेले आहे त्याची नक्कल सही शिक्क्यानुसार मिळावी.

यावर जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की, नगरपरिषदेची स्थापना दि. ११/११/१९८२ पासून झाली. सन १९९० मध्ये ग्रामपंचायतीच्या काळाचे रेकॉर्ड समाजमंदिरात हलविण्यात आले. त्या रेकॉर्डची तपासणी केली असता अपीलार्थीनी

मागितलेले रेकॉर्ड प्राप्त झाले नाही. तथापि ठरावाची प्रत यापूर्वीच पुरविण्यात आलेली आहे. या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि. २१/८/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील मान्य करण्यात आल्याचे दि. १४/१०/२००८ रोजीच्या आदेशान्वये अपीलार्थींना कळविण्यांत आले. यावर व्यथित होऊन अपीलार्थींनी दि. ९/१/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

यावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपीलार्थींनी त्यांच्या दि. २५/५/२००९ च्या पत्रान्वये त्यांचे लेखी निवेदन सादर केले. अपीलार्थींनी सादर केलेले अपील अर्ज व त्या अनुषंगाने दिलेले लेखी निवेदन याचे अवलोकन करता असे दिसून येते की, मालमत्ता ज्या कागदपत्रांच्या आधारे हस्तांतरित केली आहे ती कागदपत्रे नगरपरिषदेने कायमस्वरुपी जतन करण्याची जबाबदारी नगरपरिषदेची आहे. तेव्हा या कागदपत्रांचा कसून शोध घेण्यांत यावा व ती अपीलार्थींना सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांचे आत अपीलार्थींना पुरवावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २३ जून , २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/७२७**

**श्री. शैलेंद्र सुकदेव तेली ----अपीलार्थी**
**द्वारा- राजेश मांगीलाल पाथरे**
**रा आनंद छाया स्टॉप, गजानन अपार्टमेंट,**
**सातपूर कॉलनीजवळ, नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी -----उत्तरवादी**
**नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
**निवासी उप जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, नाशिक.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १५/१२/२००८

सुनावणीचा दि. २४/६/२००९

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी (सौ. एस.एस.कुळकर्णी, चिटणीस) उपस्थित.

अपीलार्थीनी दि. २३/६/२००८ च्या अर्जान्वये सन २००० ते २००१ या कालावधीत अनुकंपा तत्वावर दिलेल्या नेमणूकीची यादी व त्यास अनुषंगिक माहिती मागितली. यावर जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. उत्तराचे पत्र अपीलार्थीना दि. ८/७/२००८ रोजी प्राप्त झाले. या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीनी दि. १/८/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील प्रथम अपिलीय अधिका-यांनी अंशतः मान्य करुन

अपीलार्थींनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ ची माहिती नगरपालिका शाखेकडून प्राप्त करुन १० दिवसांत पुरवावी असे आदेश दि. १३/८/२००८ रोजी दिले.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या निर्णयाविरुध्द अपीलार्थींनी दि. १५/१२/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे सादर केले. संबंधित कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना पुरविलेली माहिती बरोबर आहे. सबब खालील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २५ जून , २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/७१९**

**सौ. वैशाली एकनाथ सोनवणे ----अपीलार्थी**
**गुरुविहार, गुरुनगर,**
**नेहरु नगर, म्हसोबा मंदिराच्या मागे,**
**नाशिक रोड, जि. नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी**
**(परिमंडळ) नाशिक शहर, गडकरी चौक्,**
**नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**विभाग- २, नाशिक शहर, नाशिक.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ७/११/२००८

सुनावणीचा दि. २४/६/२००९

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. १२/७/२००८ च्या अर्जान्वये दि. २७/५/२००७ ते ३१/५/२००७ या कालावधीतील अटक रजिस्टरची सत्यप्रत तसेच अंबड पोलीस स्टेशनचे लॉकअप रजिस्टरची सत्यप्रत मागितली. ही माहिती अपीलार्थी यांनी रु. ७/- शुल्क भरुन घेऊन जाण्यास सांगण्यांत आले. तथापि, फी भरुन सुध्दा माहिती मिळाली नाही असे नमूद करुन दि. १/९/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर दि. १६/९/२००८ रोजी

सुनावणी झाली. याचे आदेश दि. १६/९/२००८ रोजी देण्यांत आले व त्याचबरोबर माहितीच्या प्रती अपीलार्थीना पुरविण्यांत आल्या.

यावर समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि. ७/११/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. यात त्यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींचे म्हणणें ऐकून घेतले व माहिती अर्जाशी संबंधित कागदपत्रे पडताळली. अपीलार्थीना दिलेली माहिती बरोबर असल्याचे आढळले. सबब खालील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २५ जून , २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६६७**

**संपादक, गौतम संतोष पारेराव ----अपीलार्थी**
**दै.बहुजन परिवर्तन कार्यालय, भिमनगर,**
**गुरुकुल हायस्कुल जवळ, साक्री रोड, धुळे.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त -----उत्तरवादी**
**महानगरपालिका, धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी**
**महानगरपालिका, धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलार्थी श्री. गौतम संतोष पारेराव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३/१/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे येथे दि. २६/५/०९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी हजर होते.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २/१२/२००८ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागितली होती.**

**" धुळे महानगरपालिका निवडणूकीतील प्रभाग क्रमांक ३४ व ३५ चे झालेले मतदानासंबंधी मतदान केलेल्या मतदारांची सहयांसहीत नांवे, तसेच सर्व मतदान प्रक्रियेतील संक्षिप्त अहवाल व प्रभाग क्रमांक ३५ मधील मनिषा विजय पटाईत यांचे नाम निर्देश पत्राची प्रत तसेच प्रभाग क्र. ३४ मधील जितेंद्र उंदा शिरसाठ यांचे नाम निर्देश पत्र आदींसह निवडणुकीचा अहवाल देण्यात यावा. "**

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २२/१२/०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ७/१/०९ रोजी सुनावणी आयोजित केली. माहिती दिली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००८ वार्ड क्र. ३४ व ३५ चे झालेल्या मतदारांचे सहयांची नावाची यादी कार्यालयात उपलब्ध नाही असे अपीलार्थीस जन माहिती अधिका-यांकडून कळविण्यात आले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्देशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. १३/१/२००९ च्या पत्रानुसार सुधारित उत्तर दिले. चिन्हांकित मतदार यादी ठेवलेले पाकीट, नमुना व्ही एम-१ या नमुन्यात ठेवलेल्या मतदार नोंदवही असलेले पाकीट, नमुना व्हीएम-४ या नमुन्यात प्रत्येक मतदारासमोर नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशोब केलेले पाकीट, निवडणूक संदर्भातील अन्य कागदपत्र या बाबी सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस उघडता येणार नाही. अथवा त्याचे निरीक्षण करता येणार नाही, अथवा कोणासमोर सादर करता येणार नाही अशी तरतुद आहे. यामुळे चिन्हांकित मतदार यादी कार्यालयाकडे नसल्याने ती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलार्थीस जन माहिती अधिका-यांनी कळविले. यावरुन अपीलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## ---आदेश---

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २६ जून , २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६३१**

**संपादक, गौतम संतोष पारेराव ----अपीलार्थी**
**दै.बहुजन परिवर्तन कार्यालय, भिमनगर,**
**गुरुकुल हायस्कुल जवळ, साक्री रोड, धुळे.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक**
**जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. गौतम संतोष पारेराव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१/१/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे येथे दि. २६/५/२००९ रोजी सुनावणीचा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपीलार्थी हजर होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६/८/२००७ रोजी अर्ज करुन धुळे जिल्हा न्यायालयातील चिफ कोर्टात क्रिमीनल केस क्र. १२५/९९ या केसचा निकाल लागला होता. त्यात अपीलार्थीसह चार आरोपी होते. फिर्यादी संजय भावराव जगताप व पोलीस होते. गुन्हा मारामारीचा होता. त्या केसचा निकाल लागून सदर केसमधील सर्व आरोपींना निर्दोष सोडण्यात आले होते. त्या निकालपत्राची प्रत मागितली होती. जन

माहिती अधिका-यांनी माहिती दिली. माहितीकरिता अधिक शुल्क आकारणी केली. दिलेली माहिती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. ४/९/२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २९/११/०७ व दि. ३०/११/०७ रोजी सुनावणी घेण्यांत आली. दि. ४/१२/०७ रोजी आदेश पारित करण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी सुनावणीस फौजदारी केस क्र. १२५/९९ मधं्ल निकालपत्राची प्रत मागितली होती. त्यानंतर त्यांनी केस रजिस्टरमध्ये अपीलार्थीनी पाहिलेल्या पानाच्या प्रतीची मागणी केली. त्यानुषंगाने त्यांना सदरची प्रत देण्यात आली. अपीलार्थीस रजिस्टरच्या दोन पानांची एक छायाप्रत देण्यांत आली. दोन्ही पाने एकाचवेळी एकाच पानावर झेरॉक्स करण्यात आली आहेत. अपीलार्थीकडून एका पानाच्या प्रतीसाठी घेण्यात आलेले शुल्क रु. २०/- इतके आहे. अपीलार्थीकडून र. १०/- जास्त घेण्यांत आले आहेत. ती रक्कम परत करण्यात यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४/१२/०७ रोजी आदेश पारित केले. रक्कम रु.१०/- परत घेऊन जाण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि. १४/१२/२००७ रोजी अपीलार्थीस कळविले. द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिका-यांनी लेखी अहवाल सादर करुन असे प्रतिपादन केले की, अपीलार्थीकडून आवश्यक ती फी घेऊन नक्कल दि. १/९/२००७ रोजी अपीलार्थीस पुरविण्यात आली. यावरुन अपीलार्थीस माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २६ जून , २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६३८**

**श्री. बाजीराव जागडे पाटील ----अपीलार्थी**
**५, प्रमोद नगर, सेक्टर २,**
**देवपूर, धुळे.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी -----उत्तरवादी**
**जिल्हाधिकारी कार्यालय धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी**
**नगरपरिषद दोंडाई, ता. शिंदखेडा.**

***---विवेचन---***

श्रीयुत बाजीराव जागडे पाटील यांनी आयोगाकडे दि. १४/११/२००७ रोजी जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. २६ मे, २००९ रोजी धुळे मुक्कामी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीस श्रीराम जागो पाटील यांनी दोंडाईचे येथे केलेल्या पक्क्या बांधकामासंबंधीची माहिती अपीलार्थीस दि. ३/८/२००७ रोजीच्या अर्जाने पाहिजे होती. पण त्यांना अजूनपर्यंत कोणतीही माहिती मिळाली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे त्यांना कलम ११ अन्वये नोटीस काढून माहिती देण्याच्या बाबतीत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ न्वये जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश मिळाल्यापासून २० दिवसांत निर्णय घ्यावा. तसेच अपीलार्थीचा मुळ अर्ज मिळाल्यानंतर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमाच्या कलम २० अन्वये त्यांचेवर

**शास्तीची कारवाई का करण्यांत येऊ नये याचा खुलासा रजिस्टर्ड पोष्टाने हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत पाठवावा.**

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**दिनांक. २६ जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५१२

श्री.भास्कर गुलाबसिंग गिरासे ----अपीलार्थी
श्री. अशोक नामदेव पाटील
१३९, गांधी नगर, धुळे रोड,
नंदुरबार, ता. जि. नंदुरबार.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता -----उत्तरवादी
बांधकाम उप विभाग, पंचायत समिती अक्कलकुवा,
जिल्हा नंदुरबार.

२.जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता
बांधकाम उप विभाग, पंचायत समिती अक्कलकुवा,
जिल्हा नंदुरबार.

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०/७/२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २५/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २/३/२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

आपल्या उपविभागाअंतर्गत झालेल्या सर्व कामांची यादी, त्यावर झालेला खर्च, काम करणा-या यंत्रणेचे नांव, निरीक्षकाचे नांव, निरीक्षकाने कामाबाबत सादर केलेले अहवाल, कामावर झालेल्या एकूण खर्चाच्या पावत्या इ. छायांकित प्रती.

जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थींनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३/५/२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थींनी वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

या परिस्थिती मी असे आदेश देत आहे की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलार्थींनी मागितलेली माहिती देण्यांत यावी. तसेच अपीलार्थींनी मागितलेली माहिती विहित मुदतीत न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई कां करण्यांत येऊ नये याबाबतचा खुलासा हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसांत सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यांत येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. २६ जून , २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५१६

श्री.भास्कर गुलाबसिंग गिरासे ----अपीलार्थी
श्री. अशोक नामदेव पाटील
१३९, गांधी नगर, धुळे रोड,
नंदुरबार, ता. जि. नंदुरबार.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी -----उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार, जि. नंदुरबार.

२.जन माहिती अधिकारी तथा चिटणीस
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार, जि. नंदुरबार.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२/३/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २५/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दि. ४/२/२००६ रोजीच्या लोकशाही दिनी सादर झालेल्या निवेदन क्र. सप्टेंबर/०१/२००६ या अर्जावर /निवेदनावर झालेल्या कार्यवाहीचा तपशील, शिक्क्या सहीनिशी टिप्पणीची छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलार्थीनी

मागणी केलेली माहिती सत्वर देणेत यावी असे दि. २८/४/२००८ रोजी आदेश पारित केले. दि. १७/४/२००८ रोजी माहिती देण्यांत आली व दि. १८/५/२००९ रोजी U.P.C. ने ही माहिती दिली आहे. मात्र माहिती मिळाली नसल्याचे कारण दर्शवून अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विलंबाने दिली असल्याचा मुद्दा उपस्थित करुन त्यांना दंडीत करण्याची अपीलार्थीनी मागणी केली. जन माहिती अधिकारी विहित कालावधीत माहिती देऊ शकले नाही याचे कारण दुस-या विभागाकडून ही माहिती घेवून द्यायची होती असे दिले आहे.

असे जरी असले तरी यापुढे अर्जातील इतर जन प्राधिकरणाशी संबंधित भाग त्यांचेकडे अर्ज मिळाल्यापासून पांच दिवसांचे आंत पाठवावा व संबंधित प्राधिकरणाने १ महिन्याचे आंत माहिती द्यावी ही पध्दती अमलात आणावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २६ जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५३१**

**श्री. देवमन नारायण आहेरराव ----अपीलार्थी**
**मु. पो. खांडबारा,**
**ता. नवापुर, जिल्हा नंदुरबार.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी -----उत्तरवादी**
**पंचायत समिती, नवापूर. जिल्हा नंदूरबार.**

**२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत खांडबारा, ता. नवापूर, जि. नंदूरबार.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. देवमन नारायण आहेरराव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६/१२/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २५/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ८/१०/२००८ रोजी अर्ज करुन ग्रामपंचायत खांडबारास सन २००२- २००३ ते २००६-२००७ हया कालावधीत विविध विकास योजना राबविण्यासाठी मिळालेले प्राप्त अनुदान, झालेला खर्च, विकासात्मक कामाचे वर्णन, सद्य:स्थिती, शिल्लक निधी याबाबत सविस्तर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १४/१०/२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस अर्जातील

त्रुटीबाबत अपीलार्थीस कळविले व अर्ज अपीलार्थीस परत पाठविले. यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०/१०/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन वरील परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. त्रुटी काढून अर्ज परत पाठविला. मागितलेली माहिती मिळावी असा अपीलार्थीनी द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे.

यापरिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस त्यांच्या मुळ अर्जातील मुद्दयांबाबत आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत पुरवावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितानी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २६ जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५३२**

**श्री. देवमन नारायण आहेरराव ----अपीलार्थी**
**मु. पो. खांडबारा,**
**ता. नवापुर, जिल्हा नंदुरबार.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी -----उत्तरवादी**
**पंचायत समिती, नवापूर. जिल्हा नंदूरबार.**

**२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत खांडबारा, ता. नवापूर, जि. नंदूरबार.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. देवमन नारायण आहेरराव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२/१२/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २५/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १/१/२००७ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन ग्रामपंचायत कार्यालय ग्रामपंचायत खांडबारा, ता. नवापूर, जि. नंदूरबारच्या कामकाजाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. २०/९/०७ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ८/३/२००७ रोजी प्रथम

अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २४/१०/०८ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस चुकीची माहिती दिली असल्याचे अपीलार्थीनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी आयोगाच्या निदर्शनास आणले. ग्रामपंचायत खांडबारा कार्यालयाचे गेल्या ५ वर्षाची लेखापरिक्षणाची माहिती दिली नाही. लेखा परिक्षण झाले नसल्याचे कळविले. चालू वर्षात किती अनुदान मिळाले व कोणत्या योजनांवर किती खर्च आला याबद्दल प्रत्येक ग्रामसभेत माहिती देता येणार नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी गांवात राहात नाहीत त्यांनी सक्षम अधिका-यांची परवानगी घेतली आहे काय १ नियोजित भाजी मार्केट कोणत्या ठिकाणी आहे. घरकुल योजनेतील घरांची खरेदी विक्री झाली आहे याबद्दल अपूर्ण माहिती दिली आहे ती पूर्ण माहिती द्यावी. ग्रामपंचायत सदस्य पद कोणत्या कारणास्तव रद्द होऊ शकते याबाबत अपीलार्थीनी माहिती मागितली आहे.

या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस अर्जातील मुद्दयाबाबत सविस्तर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आंत पुरवावी.

***---आदेश---***

**अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २६ जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५३५
क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५३६

श्री. शरद लक्ष्मण पाटील ----अपीलार्थी
मु, सुकवड, पो. विश्वनाथ,
ता. जि. धुळे, पिन -- ४२४ ३१८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी -----उत्तरवादी
( माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
जय योगेश्वर माध्यमिक विद्यालय विश्वनाथ,
ता. जि. धुळे, पिन ४२४ ३१८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५/१२/२००८

सुनावणीचा दिनांक २६/५/२००९

या दोन्ही अपीलातील मुळ अर्जानुसार अपीलार्थींनी श्रीमती ज्योती बागुल व श्री. आर.एम. पाटील या शिक्षकांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रे , मस्टर वरील नोंदींच्या सहया साक्षांकित प्रती तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिपचे वाटप याबाबत माहिती मागितली होती.

अपीलार्थी हे बेरोजगार असून त्रास देण्याच्या उद्देशाने अशी माहिती अनेक शिक्षकांच्या बाबतीत मागणी करीत असतात असे मुख्याध्यापक यांचे म्हणणे होते. मात्र

शिक्षणाधिकारी  तथा अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस हवी असलेली माहिती देण्यात यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना दिलेले आहेत.   तसेच सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती  ८ दिवसांत देण्यात येईल असे निवेदन दिलेले आहे.   त्याप्रमाणे अपीलार्थीस माहिती देण्यांत यावी.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यांत येत आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  २६ जून , २००९   राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६२३**

**श्री. संजय दौलत नगराळे ----अपीलार्थी**
**आंबेडकर चौक, गौतम पान सेंटर,**
**दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे ( ४२५ ४०८)**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त -----उत्तरवादी**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**२.जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक**
**धुळे महानगरपालिका, धुळे.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २२/९/२००८

सुनावणीचा दिनांक २६/५/२००९

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस धुळे महानगरपालिका मागासवर्गीय नोकर भरती, दि. ९/९/१००३ मधील विशेष भरती , जाहिरातीद्वारा भरण्यांत आलेल्या पदांबाबत माहिती व कागदपत्रे पाहिजे होती.

अपीलार्थींनी सुध्दा दि. १/७/२००८ रोजी शुल्क भरुन व अभिलेख्यांची निवड करुन माहिती प्राप्त केलेली होती. मात्र त्याने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांकडे केलेल्या अपीलात आणखीन काही मुद्दयांची माहिती देण्यांत यावी असे निर्देश प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेले आहेत. तरीही आवश्यक माहिती मिळाली नाही असेच

द्वितीय अपीलात अपीलार्थीचे म्हणणे आहे. पण त्यांत अपिलीय अधिका-यांनी नमूद केलेल्या कोणत्या मुद्दयांबाबत किंवा त्यांच्या मुळ अर्जातील कोणत्या मुद्दयाबाबत माहिती मिळाली नाही हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही.

सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी हे अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे त्यांना उपलब्ध सर्व माहिती दिलेली आहे. तेव्हा अपीलार्थींनी हवे तर पुन्हा नस्तीची तपासणी करावी आणि याअगोदर प्राप्त करुन घेतलेल्या कागदपत्रां व्यतिरिक्त आणखीन कागदपत्रे पाहिजे असल्यास ती त्यांना देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २६ जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५१७

सौ. छाया चंद्रकांत कुलकर्णी ----अपीलार्थी
श्री सुलक्षणा, प्लॉट नं. ५ अ, शारदानगर,
शिरपूर, जि. धुळे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव/ अध्यक्ष -----उत्तरवादी
श्री हनुमान व्यायाम मंदिर ट्रस्ट,
बाबुराव वैद्य मार्केट शिरपूर, जि.धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
सरस्वती प्राथमिक विद्या मंदिर, शिरपूर, जि. धुळे.

*---विवेचन---*

अपीलार्थी सौ. छाया चंद्रकांत कुलकर्णी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १/११/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २५/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांचे वतीने ॲड्. श्री. अग्रवाल हे हजर होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १२/८/२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. इयत्ता ५ वी ते ७ वी साठी विषय शिक्षक म्हणून नेमणूक दिलेल्या शिक्षकाचे नांव व शैक्षणिक पात्रतेविषयी माहिती.

२. वरील कर्मचा-यास न.प. शिरपूर शिक्षण मंडळाने दिलेली मान्यता किंवा न दिल्यास त्याबाबतचे लेखी पत्र.

३. आज दि. १२/८/२००८ पर्यंत इयत्ता ५ वी ते ७ वी साठी मंजूर झालेले अनुदानाचे पत्र (झेरॉक्स )

४. मंजूर कर्मचारी सुची ( इयत्ता ५ वी ते ७ वी. )

अपीलार्थीनी ज्या मुद्दयाबाबत माहिती मागितली आहे त्या मुद्दयावर त्यांनी मा. उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. सदर बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे अपीलार्थीस माहिती देता येईल किंवा कसे याबाबत कायदे सल्लागार यांचे मत जाणून जी माहिती देता येत असेल ती तातडीने देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. २९/८/०८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १६/९/०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी वर नमूद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. अपीलार्थीस न्यायालयीन प्रकरणाकरिता माहिती हवी असावी असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवावी. अन्यथा अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-यांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

***---आदेश---***

*अपील मान्य करण्यात येत आहे.*

*प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यापुढे  कटाक्षाने विहित मुदतीत प्रथम अपीलाचा  निर्णय द्यावा  अशी समजहि त्यांना देण्यांत येत आहे.*

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक.  २९ जून , २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५४०**

**श्री. अरुण तुमडू चौधरी ----अपीलार्थी**
**अंबाजी नगर, महावीर पतपेढी समोर,**
**शहादा, जि. नंदुरबार.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**कृषि विभाग, नंदूरबार.**

**२.जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,**
**नंदूरबार.**

***---विवेचन---***

**अपीलार्थी श्री. अरुण तुमडू चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६/१२/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २५/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १६/६/२००८ रोजी अर्ज करुन खालील प्रमाणे माहिती मागितली होती.**

**(अ) जलसंधारण योजने अंतर्गत बांधण्यात आलेले सिमेंट व मातीचे बंधारे सविस्तर माहिती.**

**(ब) रोजगार हमी योजने अंतग्रत करण्यात आलेली कामे.**

(क) फळबाग लागवडसाठी आलले अनुदान व खर्च झालेला निधी चा तपशील.

(ड) पात्र लाभार्थ्यांची यादी. पत्त्यासह.

(इ) पिक कर्ज अनुदान पात्र लाभार्थी यादी

(फ) विविध शासकीय योजना, लाभार्थी यादी

(ग) अनुदानीत लाभार्थ्यांची यादी.

(घ) आपल्या विभागामार्फत बचत गटांना अनुदान देण्यात आले असेल तर ती यादी, योजनेचे नांव, झालेला खर्च.

(द) पिक विमा योजने अंतर्गत देण्यात आलेल्या पात्र लाभार्थी शेतक-यांची यादी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. ६/१०/०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती दि. २९/१/०९ च्या पत्रानुसार जन माहिती अधिका-यांनी टपालातून पोष्टाने पाठविण्यात आल्याचे सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. टपालातून माहिती मिळाली नसल्याचे अपीलार्थीचे म्हणणे आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी दि. २९/१/०९ च्या सहपत्रासह आवश्यक त्या माहितीच्या छायाप्रती पुन्हा विनाशुल्क अपीलार्थीस पुरवाव्यात.

***---आदेश---***

*अपील निकाली काढण्यात येत आहे.*

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २९ जून , २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५१९**

**शालिनी लक्ष्मण नाईक ----अपीलार्थी**
**रा. गोलबगीचा, देवपूर, धुळे,**
**जि. धुळे.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी -----उत्तरवादी**
**पंचायत समिती धुळे,**
**गटविकास अधिकारी धुळे यांचे कार्यालय,**
**ता. जि. धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक**
**वलवाडी ग्रामपंचायत, ता. जि. धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलार्थी श्री. अरुण तुमडू चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५/१०/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २५/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होत्या.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १४/७/२००८ रोजी अर्ज करुन खालील प्रमाणे माहिती मागितली होती.**

**वलवाडी शिवार येथील दैठनकर नगर मधील अतिक्रमण मिळकत क्र. ४५८/२, ४५९:२, ४६०/२ चे सन ८९-९० व ९०-९१ चे गांव नमुना नंबर ८ चे उतारे मिळणेबाबत व घर नंबर २३० ते ४५८ पर्यंत च्या बांधकाम परवानगीचे आदेश ग्रामपंचायत वलवाडीने**

दिले आहेत त्यांच्या बांधकाम परवानगीची पत्रे व त्यांचे ठरावांच्या समजतील अशा तारीख व वर्षनुसार झेरॉक्स नकला मिळाव्यात.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १६/८/०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन वरील नमूद माहिती मागितली होती. माहिती तयार करुन ठेवली आहे. माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहाण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस पत्र पाठविले. अपीलार्थीकडून पत्र स्वीकारली नाहीत. ते त्या गांवी हि राहात नाहीत. माहितीपोटी शुल्क भरुन अपीलार्थी माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलार्थीनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांत शुल्क भरावे व माहिती प्राप्त करुन घ्यावी.

***---आदेश---***

*अपील निकाली काढण्यात येत आहे.*

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. २९ जून , २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६१३

श्री. बाजीराव जागो पाटील ----अपीलार्थी
प्रमोदनगर, सेक्टर २, देवपूर, धुळे.
ता. जि. धुळे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी -----उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे, जि.धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिलदार कार्यालय शिंदखेडा, जि. धुळे.

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. बाजीराव जागो पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३/९/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २६/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १३/५/२००८ रोजी अर्ज करुन मौजे मांडळ शिवार भूखंड क्रमांक ८१/१अ च्या "ड" पत्रकात विहिरीची नोंद आहे. त्यानुसार ७/१२ च्या इतर हक्कात नोंद घ्यावी व नक्कल द्यावी अशी व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यां कडे दि. १५/७/०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित

केली नाही.   माहिती दिली नाही.   त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थींनी जन माहिती अधिका-यांकडे दि. १०/९/०८ रोजी अर्ज करुन मांडळ शिवारात ता. शिंदखेडा येथे सरकारी जागेत गांजल्या नाल्याकाठी विहिर खोदण्यासाठी किंवा अपीलार्थींची विहिर हडपण्याच्या परवानगीसंबंधी श्री. बाजीराव जागो पाटील व इतर दोन व्यक्ती यांनी दि. ७/७/०८ च्या तक्रार अर्जान्वये हरकत घेतली आहे काय व इतर ५ मुद्दयाबाबत माहिती मागितली होती.   सदर मुद्दयांच्या माहिती अपीलार्थीस देण्यात आली असल्याचे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीचे वेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले ते पुढीलप्रमाणे -

तहसिलदार, शिंदखेडा, जिल्हाधिकारी धुळे यांचेकडेस दि. १३/५/०८ व दि. १५/७/०८ रोजी केलेल्या तक्रार अर्जाची तहसिलदार शिंदखेडा व जिल्हाधिकारी धुळे यांनी दखल घेतली नाही व आदेशही केला नाही अशी तक्रार नमूद केली आहे.

तक्रारी अर्जदार यांनी वर नमूद केलेले दि. १३/५/०८ व १५/७/०८ रोजी केलेले तक्रारी अर्ज अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात आढळून येत नाहीत. तथापि, तक्रारी अर्जदार यांनी दि. ७/७/०८ रोजी उपरोक्त विषयाबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक व अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयास तक्रारी अर्ज दाखल केला आहे.

तसेच माहितीच्या अधिकारांत दि. १०/९/०८ रोजी अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयाकडे अर्ज केला असून सदर अर्जातील मुद्दे खालील प्रमाणे असून, त्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

| अ.नं. | मुद्दा | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| १. | मौजे मांडळ, तालु. शिंदखेडा शिवारातील सरकारी जागेत गांजल्या नाल्याकाठी विहिर खोदण्यासाठी किंवा आमची खोदलेली विहिर हडपण्याची परवानगी संबंधी समजले वरुन आम्ही १. बाजीराव जागो पाटील, २. पंडित जागो पाटील व ३.आत्माराम जागो पाटील यांनी दि. | अर्जदार यांनी हरकत घेतलेली आहे. सदरचा अर्ज तहसिलदार, शिंदखेडा यांचेकडेस दिनाक ३१/७/२००८ अन्वये चौकशीसाठी पाठविण्यात आला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ७/७/०८ च्या तक्रारी अर्जान्वये हरकत घेतली आहे हे खरे आहे काय | |
| २ | वरील संबंधी जयराम जागो पाटील, श्रीराम जागो पाटील, चतुर जागो पाटील, श्रीपत जागो पाटील यांनी मा. जिल्हाधिकारी धुळे यांचेकडे अर्ज केला आहे काय १ त्याची प्रमाणित नक्कल व इनवर्ड नंबर मिळावा. सदरचा अर्ज तहसिलदार, शिंदखेडा यांचेकडे कधी व कोणत्या जा.नं. ने पाठविला याची माहिती मिळावी. | याबाबतची माहिती अर्जदार यांना इकडील पत्र दिनांक १९/९/२००८ अन्वये पुरविण्यात आली आहे. |
| ३. | जयराम जागो पाटील वगैरेंचा विहिर खोदणे किंवा आमच्या विहिरीचा ताबा परवानगीचा अर्ज दिला आहे काय १ त्यासंबंधी मंडळ निरीक्षक विखरण यांनी चौकशी केली आहे काय १ त्याकामी कोणाकोणाचे जबाब घेतलेत त्यांच्या व नियोजित विहिरीचा नकाशा इत्यादीच्या नकला व माहिती मिळावी. | जयराम जागो पाटील वगैरे यांनी शासकीय जागेवर विहिर खोदण्यासाठी केलेला अर्ज तहसिलदार शिंदखेडा यांचेकडेस चौकशीसाठी प्रलंबित असलेने सदरची माहिती तहसिलदार, शिंदखेडा यांनी अर्जदार यांना त्यांच्या स्तरावरुन पुरवावी अशा सूचना दि. १२/९/२००८ च्या पत्रान्वये तहसिलदार, शिंदखेडा यांना देण्यात आल्या आहेत. |
| ४. | सरकारी जागेवर विहिर खोदून खाजगी शेतात पाणी नेण्यासाठी कोणता शासकीय निर्णय अथवा जी.आर (राजपत्र) आहे त्याची प्रमाणीत नक्कल व माहिती मिळावी. | शासन निर्णय दि. २२/११/१९५० व शासन परिपत्रक दि. ९/१०/१९८० च्या प्रती अर्जदार यांना दि.१९/९/२००८ च्या पत्रान्वये पुरविण्यात आल्या आहेत. |
| ५. | G.S.D.A. यांचा अहवाल मंडळ निरीक्षक विखरण यांनी मागविला आहे काय १ त्याची प्रमाणित नक्कल व माहिती मिळावी | प्रस्तुत मुद्दयावर अद्याप चौकशी होणेवर प्रलंबित आहे. |
| ६. | आजतागायत आमच्या दि. ७/७/०८ च्या हरकती व तक्रारी अर्जानुसार चौकशी झाली नाही. शा.नि. नुसार तक्रारी व हरकती अर्जाची १ महिन्याचे आंत चौकशी करुन मा.जिल्हाधिकारी धुळे यांना अहवाल पाठविणे बंधनकारक असते. परंतु तसे झाले नाही याबाबत माहिती व प्रमाणित नक्कल मिळाव्यात. | शासनाकडेस अस्तित्वात असलेली माहिती १ महिन्याच्या आंत देणे बाबतची तरतुद माहितीच्या अधिकारात नमूद आहे.<br>तथापि प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार शिंदखेडा यांचेकडून पूर्ण मुद्दयावर चौकशी प्रलंबित आहे. संपूर्ण चौकशी झाल्यानंतर या |

| | | |
|---|---|---|
| | | कार्यालयाने घेतलेला निर्णय अर्जदार यांना कळविण्याबाबत दक्षता घेता येत आहे. |

श्री. श्रीपत जागो पाटील वगैरे ४ यांनी दि. १७/४/०८ रोजी केलेल्या अर्जाचा चौकशी अहवाल तहसिलदार, शिंदखेडा यांनी दि. २२/५/०९ च्या पत्रान्वये सादर केला असता, प्रस्तुत प्रकरणाची चौकशी प्रलंबित आहे. तसेच तक्रारी अर्जार श्री. बाजीराव जागो पाटील यांनी महाराष्ट्र शासन व अर्जदार श्री. श्रीपत जागो पाटील वगैरे यांचे विरुध्द मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर धुळे यांचे न्यायालयात रे.मु.नं. २८०/२००८ अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा सद्यःस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

अपिलीय अधिका-यांचा वरीलप्रमाणे अहवाल पाहिला असता अपीलार्थी यांना सद्यःस्थितीची माहिती दिल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. २९ जून , २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/९५८३/अपील क्रमांक २२५०/०२**

**श्री. जमनादास मॅथ्रादास -----अपीलार्थी**
**फ्लॅट नं. ३१, ३ रा मजला, सॉमरसेट अपार्टमेंट,**
**५८, श्रीमती नर्गीस दत्त रोड, पाली हिल,**
**बांद्रा (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**दि महानगर को.ऑप.बँक.लि.**
**२०१-२०८, तळमजला, हिरामणी सुपर मार्केट बिल्डींग,**
**लालबाग, डॉ. आंबेडकर रोड, मुंबई ४०० ०१२.**

**२. जन माहिती अधिकारी**
**दि महानगर को.ऑप.बँक.लि.**
**२०१-२०८, तळमजला, हिरामणी सुपर मार्केट बिल्डींग,**
**लालबाग, डॉ. आंबेडकर रोड, मुंबई ४०० ०१२.**

***---विवेचन---***

**श्रीयुत जमनादास मॅथ्रादास यांनी आयोगाकडे दि. ५/१०/२००६ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. २३ एप्रिल, २००८ रोजी घेण्यांत आली होती. अपीलार्थीनी दि महानगर को.ऑप.बँक.लिमि. यांच्याकडून कांही माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ अन्वये मागितली होती. मात्र सदरील बँक ही माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे "जन प्राधिकरण " नाही त्यामुळे त्यांना माहिती देणे बंधनकारक नाही असे बँकेने अपीलार्थीस कळविले होते, त्याविरुध्द सदरचे अपील आहे.**

सुनावणीच्या वेळेला अनेक हायकोर्टामध्ये सहकारी बँकांना कायदा लागू आहे किंवा नाही तसेच सहकार संस्था व विशेष करुन सहकार बँकांना हा कायदा लागू आहे किंवा नाही याबाबत रिटपिटीशन प्रलंबित होते व त्यांचे निर्णय विचारात घेऊन वरील अपीलाचा निकाल देण्यांत येईल असे सुनावणीच्या वेळेला स्पष्ट करण्यात आले होते.

कर्नाटक हायकोर्टासमोर दत्तप्रसाद को.ऑप.हौसिंग सोसायटी विरुध्द रजिस्ट्रार ऑफ को.ऑप.सोसायटी , रिट पिटीशन क्र. १६९०१/२००६ या रिट पिटीशनमध्ये दि. ३० जून, २००८ रोजी निर्णय देतांना मा. हायकोर्टाने हे स्पष्ट केलेले आहे की, सहकारी संस्था या "जन प्राधिकरण " नाहीत. राज्य शासनाचे नियंत्रणाच्या तरतुदी लक्षात घेऊन सुध्दा सहकारी संस्था या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत "जन प्राधिकरण " या संज्ञेत पात्र होत नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडून या कायद्याअंतर्गत माहिती मागता येणार नाही.

नुकताच रिट पिटीशन क्र. ५६६६/०७ डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को.ऑप.बँक लिमि. अमरावती विरुध्द रजिस्ट्रार ऑफ को.ऑप. सोसायटीज मध्ये मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने दि. १३ जानेवारी, २००९ रोजी असा निर्णय दिला की, सदरील बँकेस कुठच्याहि प्रकारे शासकीय अर्थसहाय्य देत नसल्यामुळे सदरील सहकारी बँक ही माहितीचा अधिकार अधिनियमानुसार "जन प्राधिकरण " नाही.

या दोन निर्णयातील तत्व हे दि. महानगर को.ऑप.बॅक.लिमि. या बँकेस लागू पडते. ही बँक सहकार संस्था अधिनियम १९६१ अंतर्गत स्थापन झालेली आहे. व शासनाचे त्यांना आर्थिक सहाय्य मिळालेले नाही. त्यामुळे ही बँक "जन प्राधिकरण " नाही, व माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत बँकेकडून माहिती मागता येणार नाही. मात्र अपीलार्थी सहकार संस्था अधिनियम कलम ३२ नुसार तसेच महाराष्ट्र सहकार संस्था नियम १९६१

च्या नियम ३० अन्वये संस्थेकडून माहिती मागू शकतात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. ३० जून , २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६६०**

**श्री. भिवसन चंदा भामरे (स्वातंत्र्यसैनिक) ----अपीलार्थी**
**राजगृह २१, बालाजी नगर, नकाणे रोड,**
**देवपूर, धुळे.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) -----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधीक्षक**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १९/१०/२००८**

**सुनावणीचा दि. २६/५/२००९**

**अपीलार्थी अनुपस्थित, सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी दि. २४/७/२००८ रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज दिला. यात त्यांनी दि. ३०/४/२००७ रोजी धुळे जिल्हा परिषदेतील कार्यरत अनुसूचित जातीच्या प्राथमिक शिक्षकांची नेमणूक दिनांक व सेवानिवृत्तीच्या दिनांकाची मागणी केली. माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी दि. २९/८/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. १९/१०/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिले. अपीलार्थींना तालुका स्तरावरुन माहिती पुरविलेली आहे. अपीलार्थींनी मागितलेली उर्वरित माहिती एक महिन्याच्या आत देण्यांत येईल असे सहायक जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ते मान्य करण्यात आले. अपीलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांचे म्हणणे समजाऊन घेता आले नाही.**

**सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी त्यांचा खुलासा आयोगास सादर करावा.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक. ३० जून , २००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५६१**

**श्री. गणेशराव भास्करराव विंचूरकर (देशमुख) ----अपीलार्थी**
**ओम शांती निवास, कचेरी चौक,**
**शिंदखेडा, जि. धुळे.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता -----उत्तरवादी**
**लघुसिंचन विभाग , जिल्हा परिषद धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता**
**लघुसिंचन उपविभाग शिरपूर, जि. धुळे.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. गणेशराव भास्करराव विंचूरकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९/७/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २५/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी , प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७/३/०८ रोजी अर्ज करुन मौजे शिरपूर येथील पंचायत समितीने लघुसिंचन विभागातील शासनामार्फत सन २००५ ते २००७ पर्यंतचे कालावधीत कोणकोणती कामे मंजूर झाली होती १ किती कामे पूर्ण झाली १ संपूर्ण माची मंजूरीची यादी , कामाचे नांवे, गावाची नांवे ठिकाण, ठेकेदार कोण इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती.

माहिती पोटी अंदाजीत रु. ४००/- इतके शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २/४/०८ च्या पत्रान्वये कळविले. अपीलार्थीनी दि. १०/४/०८ रोजी शुल्क भरले. परंतु जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस माहिती पुरविली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २०/५/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ९/६/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. मागणी केलेली माहिती उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती शिरपूर येथून घेऊन जावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १६/६/०८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविले. मागणी केलेली माहिती तयार आहे. कांही तांत्रिक अडचणीमुळे विहित वेळेत माहिती देता आली नाही. तात्काळ माहिती ताब्यात घ्यावी. यापुढे अपीलार्थीस पूर्ण सहकार्य करण्यात येईल. माहिती पुरविण्यासंबंधी पूर्ण दक्षता घेण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग पंचायत समिती शिरपूर यांनी अपीलार्थीस दि. १८/६/०८ च्या पत्रान्वये कळविले.

अपीलार्थीकडून माहितीपोटी रु. ४००/- इतके शुल्क घेऊनही विहित कालावधीत जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करावी. प्रथम अपिलीय अधिका-यांना समज द्यावी व माहिती मिळावी म्हणून अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन पंचायत समिती शिरपूरच्या लघुसिंचन विभागातील कामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अनुदान नसल्याच्या कारणावरुन विहित कालावधीत माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस कळविले. तसेच तात्काळ माहिती कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावी असे कळविल्याचे दिसते. माहिती पुरविण्याकरिता विहित कालमर्यादेचे पालन करण्यास कसूर झाल्यास अपीलार्थीस माहिती उक्त अधिनियमातील कलम ७ पोट कलम (६) अनुसार मोफत देण्यात येईल अशी तरतुद आहे. म्हणून अपीलार्थीकडून वसूल करण्यात आलेले शुल्क अपीलार्थीस परत करावे.

सदर प्रकरणी अपीलार्थीस माहिती पुरविण्यास जन माहिती अधिका-यांनी विलंब केला आहे. मात्र जन माहिती अधिका-यांनी जी कारणे दिलेली आहेत त्यामुळे विलंबाबद्दल त्यांनाच दोषी ठरविणे अन्यायाचे होईल. माहितीकरिता देण्यात आलेले शुल्क हे शासनाच्या बजेट हेडमध्ये जमा होते. मात्र माहिती देण्याचा खर्च त्या संस्थेस करावा लागतो व अशा खर्चाची रक्कम न मिळाल्याने माहिती देण्यास उशीर लागला हे कारण अंशतः खरे आहे. पण या सर्व अडचणीवर मात करुन जशी अंतिमतः माहिती पाठविली तसे प्रयत्न सुरुवातीपासून जन माहिती अधिकारी यांना करता आले असते.

दि. १३/३/०८ रोजी जन माहिती अधिकारी कार्यालयास मिळालेल्या अर्जाबाबत दि. २/४/२००८ रोजी पैसे भरण्यास कळविले. अपीलार्थीनी दि. १०/४/२००८ रोजी पैसे भरले. दि. २१/४/२००८ पर्यंत माहिती देणे आवश्यक होते. वरील अडचणींमुळे दि. २८/५/२००८ रोजी अपीलार्थीस माहिती घेऊन जाण्याबद्दल कळविले. तसेच प्रथम अपिलीय सुनावणीच्या वेळी सुध्दा अपीलार्थीस माहिती घेऊन जाण्यास सांगण्यात आले.

वरील सर्व बाबी लक्षात घेतल्या तरी जन माहिती अधिकारी यांना झालेल्या ३६ दिवसांच्या विलंबाबाबत पूर्णपणे दोषमुक्त करता येणार नाही. मात्र विलंबाच्या पूर्ण कालावधीसाठी शास्ती न लावता त्यांनी नमूद केलेल्या कारणांचा विचार करुन रु. २,५००/- (रुपये दोन हजार पांचशे मात्र) ची शास्ती लावण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे. ही शास्ती जन माहिती अधिकारी यांच्या माहे ऑगस्ट महिन्याच्या पगारातून वसूल करुन अपिलीय अधिका-यांनी ती रक्कम शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० जून , २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-रामाआ/२८५२४/ तक्रार क्र.२५८/०१

श्री. सुनिल मधुकर वाखारकर ----तक्रारदार
इ-५/ बी ००७, हायवे पार्क, ठाकूर संकूल,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
मिठीबाई महाविद्यालय, जे.व्ही.पी.डी. स्कीम,
विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ४०० ०५६.

२.जन माहिती अधिकारी
मिठीबाई महाविद्यालय, जे.व्ही.पी.डी. स्कीम,
विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ४०० ०५६.

*---विवेचन---*

श्रीयुत सुनिल मधुकर वाखारकर यांनी यांच्या दि. ४ डिसेंबर, २००७ रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले. तसेच आयोगाच्या दि. ४ डिसेंबर, २००७ रोजीच्या आदेशानुसार श्रीयुत सुनिल मधुकर वाखारकर यांना दि. ४ डिसेंबर, २००७ रोजीच्याच पत्राने जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण मुंबई विभाग, मुंबई यांनी पुढीलप्रमाणे परिस्थिती निवेदित केलेली आहे.

"१. मिठीबाई कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील दि. १/१/१९८७ ते १३/८/१९८७ या कालावधीत ७ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या करण्यात आलेल्या नियुक्तीस या कार्यालयाने मान्यता दिल्याचे निदर्शनास येत नाही. परंतू महाविद्यालयाने आपणास दिनांक १९/१/२००६ च्या पत्रान्वये माहिती देताना नजरचुकीने मान्यता दिल्याचे नमूद केले

असावे. वस्तुतः या कार्यालयाने केवळ सदर कर्मचा-यांच्या वेतननिश्चितीची पडताळणी केली आहे.

२. सदर कर्मचा-यांच्या नियुक्त्या शून्याधारीत अर्थसंकल्प कालावधीतील असल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन प्रशासन अधिकारी यानी दि. १४/५/१९९१ च्या पत्रान्वये सन १९८९-९० च्या वेतन अनुदान निर्धारणामध्ये उपरोक्त कालावधीतील अतिप्रदान वेतनाची वसूली केली आहे. "

त्यात दि. १९/१/२००६ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालयाने दिलेली माहिती ही नजरचुकीने दिलेली असावी हेहि स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे मिठीबाई महाविद्यालय मुंबई येथील माहिती अधिकारी यांनी जाणून बुजून चुकीची माहिती दिलेली नाही असे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६६४

श्री. नटवर संपत तडवी ----अपीलार्थी
मु.कोराई, पो. खापर,
ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार- ४२५ ४१९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळ दोंडाईचा,
देशमुख नगर, प्लॉट नं. ३८/३९ ,
ता. शिंदखेडा, जि. धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष
संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळ दोंडाईचा,
देशमुख नगर, प्लॉट नं. ३८/३९ ,
ता. शिंदखेडा, जि. धुळे.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ६/१२/२००९

सुनावणीचा दि. २६/५/२००९

अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २०/१०/२००८ च्या अर्जान्वये कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय खापर येथील विद्यार्थ्यांना जून १९९७ ते एप्रिल २००७ या कालावधीत मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीशी संबंधित तपशिलाची मागणी केली. मागणीनुसार माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २/१२/२००८ रोजी प्रथम अपील दाखल

केले.   यावर सुनावणी न झाल्याचे नमूद करुन अपीलार्थी यांनी दि. ६/२/२००९ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, अपीलार्थींना महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून माहिती घेण्यास सूचविण्यात आले होते.  याचा विचार करता असे निर्देश देण्यात येतात की, अपीलार्थींनी मागितलेली माहिती प्राचार्यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत हायकोर्टाच्या आदेशांच्या अधीन राहून अपीलार्थी यांना पुरविण्यात यावी.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

या आदेशाची प्रत प्राचार्य , कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर , ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार यांनाहि देण्यांत यावी.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. ३० जून , २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६५२

श्री. देवमन नारायण आहेरराव ----अपीलार्थी
मु.पो. खांडबारा, ता. नवापूर,
जिल्हा नंदूरबार.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (विकास) ---उत्तरवादी
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग,
नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(ग्रामपंचायत) जिल्हा परिषद नंदूरबार.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १६/३/२००९

सुनावणीचा दि. २६/५/२००९

अपीलार्थी उपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. १३/१२/२००८ च्या अर्जान्वये अपीलार्थींनी जिल्हा परिषदेस लिहिलेल्या दि. २८/८/२००८ च्या पत्रावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या तपशीलाची मागणी केली. तथापि यावर उत्तर अप्राप्त असल्याने दि. २१/१/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर सुनावणी न झाल्याने त्यांनी दि. १६/३/२००९ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले.

यावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर राहिल्याने त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. अपीलार्थींनी मागितलेल्या

माहितीचे स्वरुप बघता ती माहिती अपीलार्थींना पुरविण्याबाबत आयोगाचे मत झाले आहे. तरी सदर अपीलावरील सुनावणीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थींना त्यांच्या दि. १३/१२/२००८ च्या मुळ अर्जात मागितलेली माहिती पुरविण्यात यावी.

तसेच सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहिल्याबद्दल व अपीलार्थीस माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्तीची कारवाई कां करु नये याचा लेखी खुलासा त्यांना स्वतः आयोगाच्या कार्यालयात दिनांक २३ जुलै, २००९ रोजी सकाळी ११-०० उपस्थित राहून करावा.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. ३० जून , २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६११

श्री. देवेंद्र रामू जपसरे ----अपीलार्थी
माध्यमिक हायस्कूल जवळ, विष्णू नगर,
देवपूर, धुळे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता ---उत्तरवादी
सर्वोपचार रुग्णालय, धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
सर्वोपचार रुग्णालय, धुळे.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५/९/२००८

सुनावणीचा दि. २६/५/२००९

अपीलार्थी उपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. देवेंद्र रामू जपसरे, धुळे यांनी दि. ५/५/२००८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी आहे.

१. डॉ. रवि वानखेडकर, मानसेवी सहा.प्राध्यापक जिल्हा सर्वोपचार रुग्णालय यांची मेडिकल बोर्डावर नेमणूक झाल्यापासून ते आजच्या (अर्जाच्या) तारखेपर्यंत त्यांनी अपंग असल्याचे किती जणांना दिले त्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती.

२. सदर डॉक्टरांच्या विरोधात आलेल्या तक्रारी व त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या सर्टिफाईड प्रती.

३. सदर डॉक्टरांनी दिलेल्या मेडिकल बीलासाठीच्या प्रमाणपत्रांच्या सर्टिफाईड प्रती.

४. डॉक्टरांच्या विरोधात आलेल्या तक्रारींची शासन स्तरावर झालेल्या कार्यवाहीचा तपशील कागदपत्रांच्या सर्टिफाईड प्रतींसह.

५. दि. ११/२/२००८ रोजी डॉक्टरांबद्दल प्रसिध्द झालेल्या वर्तमानपत्रातील बातमीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह.

उपरोक्त माहिती अपीलार्थींना दि. १६/८/२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी पुरविली. परंतु सदर पत्र प्राप्त होण्याआधी दि. २३/६/२००८ रोजी अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. यावर सुनावणी घेण्यात येऊन त्यांना दि. ४/८/२००८ च्या आदेशान्वये निकाल कळविण्यात आला. या निकालाने व्यथित होऊन आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

यावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. त्यांनी विचारलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याने कागदपत्रांच्या छायांकित प्रती देणे उचित नाही.

उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसते की, जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थींच्या मागणीनुसार मेडिकल बोर्डाने ज्यांना प्रमाणपत्र दिले आहे त्यांची नावे व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती द्यावयास हव्या होत्या. वैद्यकीय प्रमाणपत्रांचा शासकीय योजनांचा व इतर योजनांचा लाभ घेण्यासाठी होत असल्याने त्यात गोपनीय काही नाही.

डॉ. वानखेडेकर यांच्याविरुध्द झालेल्या तक्रारींचा अहवाल शासनाने मान्य केला असल्यास शासनाने त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह अपीलार्थीस देण्यास अडचण नाही. चौकशी अहवाल अंतिम झाला असल्यास त्याच्या छायांकित प्रती अपीलार्थीस पुरविण्यात याव्यात. तेव्हा अपीलार्थींच्या मागणीनुसार सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सदर आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आंत पुरविण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ३० जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५५५

श्री. दिलावरशा कादरशा ----अपीलार्थी
शादुल्ला नगर शाळा नं ९ च्या मागे,
नंदूरबार, जि. नंदूरबार - ४२५४१२.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त ---उत्तरवादी
नाशिक विभाग, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
नंदूरबार नगरपरिषद, नंदूरबार.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३/६/२००८

सुनावणीचा दि. २५/५/२००९ धुळे मुक्कामी.

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस जी माहिती पाहिजे होती त्या माहितीच्या नकला दि. ५/१/२००७ रोजी दिलेल्या आहेत. तसेच पुनश्च दि. २१/५/०९ रोजी पत्र क्रमांक २९३ ने अपीलार्थीकडे पाठविण्यांत आल्या होत्या पण अपीलार्थींनी त्या स्वीकारल्या नाहीत. त्यामुळे माहिती देण्याच्या बाबतीत जन माहिती अधिका-यांकडून खोटी झाल्याचे दिसून येत नाही. अपीलार्थी स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणे समजून घेता आले नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. ३० जून , २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५४१**

**श्री. शेख अमिन हमिद ----अपीलार्थी**
**रा. मुसलमान मोहल्ला, शाह झेरॉक्स जवळ,**
**नवापूर, जि. नंदुरबार .**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ---उत्तरवादी**
**नवापूर नगरपरिषद, नवापूर,**
**जिल्हा नंदुरबार.**

**२.जन माहिती अधिकारी तथा जकात निरीक्षक तथा आस्थापनाप्रमुख**
**नवापूर नगरपरिषद, नवापूर,**
**जिल्हा नंदुरबार.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २८/८/२००८

सुनावणीचा दि. २५/५/२००९ व २६/५/२००९ धुळे मुक्कामी.

अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये श्री. शेख अमीन हमीद यांनी दि. २६/५/२००८ च्या अर्जान्वये मागणी केलेली नवापूर नगरपरिषदेने सन २०००-२००७ पावेतो केलेल्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या कामाबाबत मागितलेली माहिती ही एकूण १ ते २७ मुद्दयांबाबत होती. नगरपरिषदेने अपीलार्थी यांना मागितलेल्या माहितीपैकी १० मुद्दयांबाबत माहिती त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक /ननपा/बांध/७८६/२००८ दिनांक २१/६/२००८ अन्वये दिली होती. परंतु अपीलार्थी यांनी ती दि. २३/६/२००८ रोजी

शिपायामार्फत घेण्यास नकार दिला व सदर माहिती मी कार्यालयात येऊन घेऊन जातो असे सागितले. पुन्हा दिनांक २४/६/२००८ रोजी अपीलार्थीस सदर माहिती देण्यास नगरपरिषद शिपाई गेले असता त्यांनी माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे मागितलेली माहिती त्यांना मुख्याधिकारी यांच्या लेखी परवानगीने रजिस्टर पोष्टाने पाठविण्यांत आली आहे.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती ही एकूण २७ मुद्दयांबाबत ७ वर्षाच्या कालखंडासाठीची होती. अंतिमतः ही माहिती जवळपास १२०० पेजेस झालेली दिसते. कारण त्याच्या फी साठी रु. २४५४/- भरावयास सांगितले आहे. त्यामुळे अपीलार्थींनी, त्यांना देवू केलेली कागदपत्रे पहावीत व त्यांना आवश्यक वाटतील तेवढयाच कागदपत्रांचे शुल्क भरुन ती माहिती घ्यावी असे आदेश देण्यांत येत आहेत. माहिती न देण्याचा जन माहिती अधिका-यांचा उद्देश नाही. त्यामुळे शास्तीचे आदेश नाहीत.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० जून , २००९ 
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६४४

श्री. वसंतराव उत्तमराव पाटील ----अपीलार्थी
२., संभाजीनगर, इंदिरा गार्डन,
देवपूर, धुळे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी -----उत्तरवादी
ग्रामपंचायत, पंचायत समिती शिंदखेडा.

२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदखेडा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. वसंतराव उत्तमराव पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६/५/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह,धुळे येथे दि. २६/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी , प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०/२/२००८ रोजी अर्ज करुन ग्रामपंचायत शिदखेडाशी संबंधित आहे. फेब्रूवारी २००७ ते जून २००७ या कालावधीत ज्या मासिक सभा झाल्या त्या सभांचे अजंडे व त्या मासिक सभांच्या प्रोसिडींगच्या सत्यप्रती, जागेच्या मालकीच्या कागदपत्रांच्या नकला, बांधकाम करावयाच्या जागेचे मोजमाप, नकाशे, ग्रामपंचायतीच्या कोणत्या कर्मचा-यासमोर मोजमाप केले त्या कर्मचा-याचे नांव, हुद्दा इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीच्या पूर्वीच्या दि. १९/११/२००७ च्या अर्जास अनुसरुन दि. ४/२/२००८ च्या पत्रान्वये ४ मुद्दयाबाबत माहिती

दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. परंतु दि. २०/२/२००८ च्या अर्जास अनुसरुन माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २४/३/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. ८/४/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलार्थी माहितीपासून वंचित राहिले आहेत. माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असतांना ती माहिती दिली नाही. यासाठी माहिती अधिकारी जबाबदार आहेत. जन माहिती अधिकारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र आहेत असे दि. २१/४/२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन श्री. कैलास निंबा पाटील यांनी केलेल्या घरबांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपीलार्थीस माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती दिली नाही. जुन्या ग्रामसेवकाने त्याच्या निलंबनानंतर दप्तर हस्तांतरित केले नसल्यामुळे माहिती देता आली नाही असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक शिंदखेडा यांनी सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जुन्या ग्रामसेवकाने दप्तर हस्तांतरित केले नसेल तर त्यांच्या विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांनी विभागीय चौकशी करुन कार्यवाही करावी. दप्तर प्राप्त करवून घ्यावे व अपीलार्थीस त्यांच्या मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती सत्वर पुरविण्यात यावी.

---आदेश---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

या आदेशाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांनाहि पाठविण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. ३० जून , २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६०३

श्री. शेख शरीफ शेख नजमोद्दीन ----अपीलार्थी
रा. सोनगीर, ता. जि. धुळे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी -----उत्तरवादी
पंचायत समिती धुळे, ता.जि. धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत सोनगीर, ता. जि. धुळे.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ११/७/२००८

सुनावणीचा दिनांक २६/५/२००९

धुळे येथे अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांनी, दिलेल्या माहितीने समाधान झाले आहे. आता तक्रार राहिलेली नाही असे लेखी निवेदन दिलेले आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक. ३० जून , २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/५९७**

**श्री. अशोक रामदास चौगुले ----अपीलार्थी**
**ग.नं. ४, राजकमल टॉकीज मागे,**
**सन्मान व्हिडीओ समोर, चौगुले किराणा,**
**धुळे - ४२४ ००१.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार -----उत्तरवादी**
**तहसिलदार कार्यालय, धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी**
**पुरवठा शाखा, तहसिल कार्यालय, धुळे.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३/११/२००८

सुनावणीचा दिनांक २६/५/२००९

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. अशोक रामदास चौगुले, धुळे यांनी दि. १८/३/२००८ च्या अर्जान्वये दि. १/१/१९९५ ते ३१/१२/२००७ या कालावधीची किरकोळ रॉकेल कंपोझिट परवान्याच्या नुतनीकरणासाठी तहसिलदारांनी जे अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी यांना पाठविले आहेत त्या सर्व अहवालांच्या प्रतींची मागणी केली. याबाबत अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी दि. १०/४/२००८ रोजी असे कळविले की, माहिती उपलब्ध असून रु. ४०/- शुल्क भरुन घेऊ जावी. तथापि असे न करता दि. ३/७/२००८ रोजी अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ८/८/२००८ रोजी असा निर्णय

दिला की, अपीलार्थींना १५ दिवसाच्या आत माहिती पुरवावी. तथापि माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थी यांनी दि. ३/११/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी असे कथन केले की, अपीलार्थींना वेळेवर माहिती दिली आहे. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांचे म्हणणे ऐकता आले नाही. सुनावणीच्या वेळी दाखविलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलार्थींना माहिती देण्यांत आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील खारीज करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३७६२१/अपील क्रमांक ४०२७/०२**

**श्री.विनोदकुमार के. मिश्रा -----अपीलार्थी**
**नगिना चाळ, यादव नगर, खैरानी रोड,**
**साकीनाका, मुंबई - ४०० ०७२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड, मुंबई - ४०० ००१.**

**२.जन माहिती अधिकारी**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड, मुंबई - ४०० ००१.**

***---विवेचन---***

**श्रीयुत विनोद के. मिश्रा यांनी आयोगाकडे दि. ३०/१२/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. १७/३/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत अपिलीय अधिका-यांचे म्हणणे हे पुढीलप्रमाणे आहे. --**

**१. अपीलार्थी श्री. विनोदकुमार मिश्रा यांनी संचालनालयास प्रथम दि. १६ जून २००८ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज सादर करताना एमएचटी-सीईटी-२००८ च्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची मागणी केली होती.**

**सदर प्रकरणी अपीलार्थीस मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांप्रमाणे प्रश्नपत्रिकेची प्रत देता येत नाही असे कळविताना जर अपीलार्थीनी विहित कालावधीत**

गुणपडताळणीसाठी अर्ज केल्यास नियमावली पुस्तिकेतील नियमाप्रमाणे आदर्श उत्तर आणि उत्तरपत्रिकेची प्रत पाठविण्यात येईल असे दिनांक १७ जून, २००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

२. संचालनालयाच्या दि. १७ जून, २००८ च्या पत्राच्या अनुषंगाने श्री. मिश्रा यांनी १४ जुलै, २००८ रोजी अपील दाखल केले होते.

सदर अपीलावर संचालनालयामार्फत दि. २२/७/२००८ च्या पत्रान्वये त्यांना सदरच्या माहितीमध्ये मागणी करण्यात आलेली प्रश्नपत्रिकेची प्रत मा. न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने उपलब्ध करुन देण्यास संचालनालय असमर्थ असल्याबाबत दि. २२ जुले, २००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

३. तद्नंतर अपीलार्थीनी दि. २६ ऑगस्ट, २००८ रोजीच्या अर्जान्वये गुणवत्ता यादी क्रमांक १ ते १२०० मधील विद्यार्थ्यांची नांवे, गुणवत्ता यादी क्रमांक आणि १२ वी इयत्तेचे गुण तसेच प्रवेश परीक्षासाठी नेमण्यात आलेल्या एजन्ट, सब-एजन्ट आणि सुपरव्हाईजर यांच्या नांवाच्या माहितीची मागणी केली होती.

त्या अनुषंगाने गुणवत्ता यादी क्रमांक १ ते १२०० पर्यंतच्या यादी करीता एकूण १८ पृष्ठांकरिता नियमाप्रमाणे रक्कम भरण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच संचालनालयामार्फत घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परीक्षेच्या आयोजनाकरीता राज्य शासनाच्या अधिपत्याखालील महसूल, शिक्षण ,वित्त व गृह विभाग तसेच संबंधित जिल्हयांचे इतर विभागांचे सहकार्य घेण्यात येते. तसेच प्रत्येक जिल्हयाकरिता सदर जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे संबंधित जिल्हयाचे परीक्षा प्रमुख म्हणून नेमण्यात येतात. उपरोक्त संबंधित विभागामार्फत नेमण्यात येणारे अधिकारी व कर्मचारी यांना समवेक्षक (invigilator) व पर्यवेक्षक (Supervisor) म्हणून नेमण्यात येते असे कळविण्यात आले होते.

४. संचालनालयाच्या उपरोक्त उत्तरावर अपीलार्थीनी दि. २२/९/२००८ च्या अर्जान्वये एमएचटी-सीईटी-२००८ च्या पहिल्या, दुस-या निवड यादीची संपूर्ण यादी तसेच रिक्त जागांची स्थिती कळविण्याबाबत नमूद केले होते.

सदर अर्जावर प्रथम निवड यादीची एकूण ८४९ पृष्ठे, द्वितीय निवड यादीची एकूण १५९१ पृष्ठे आणि रिक्त जागांच्या स्थितीचे १ पृष्ठ अशा एकूण २४४१ पृष्ठांकरिता आवश्यक ती रक्कम (संचालनालयाच्या दि. १६/१०/२००८ च्या पत्रामध्ये कळविल्याप्रमाणे ) भरणा केल्यानंतर अपीलार्थीस माहिती दि. २३/१०/२००८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली होती.

५. तद्नंतर अपीलार्थीनी दि. ८/१०/२००८ च्या अर्जान्वये एमएचटी-सीईटी-२००८ या प्रवेश परीक्षेचे अर्ज स्वीकारणा-या एजन्सीचे नांव, सदर एजन्सी निश्चित करताना करण्यात आलेली निविदा प्रक्रिया आणि मान्य करण्यात आलेली रक्कम याबाबत विचारणा केली होती. तसेच या अर्जावरुन त्यांनी एमएचटी-सीईटी-२००६ आणि २००७ या दोन वर्षातील गुणवत्ता यादी क्रमांक १ ते १५०० पर्यंतची यादी, एमएचटी-सीईटी-२००८ च्या गुणवत्ता यादीतील क्रमांक १२०१ ते ५००० पर्यंत विद्यार्थ्यांची यादी, अभ्यासक्रमनिहाय अंतिम प्रवेश प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादी आणि अर्जात नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या बारावी इयत्तेच्या गुणपत्रिकेची छायाप्रत अशी मागणी केली होती.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपीलार्थीस खालील प्रमाणे कळविण्यात आले होते.

अ. मागणी केलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याने सदरची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही.

ब. मागणी केलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याने सदरची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही.

क. या माहितीकरीता एकूण १९ पृष्ठे X २ रुपये =३८

ड. या माहितीकरीता एकूण १९ पृष्ठे X २ रुपये =३८

ई. या माहितीकरीता एकूण ४७ पृष्ठे X २ रुपये =९४

फ. सदरच्या माहितीमध्ये अन्य विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वरुपाच्या माहितीची मागणी केल्याने सदरची माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही.

अपीलार्थीनी अन्य विद्यार्थ्यांच्या बारावी गुणपत्रिकेची प्रत उपलब्ध करुन देण्याची केलेली विनंती सदरची माहिती ही त्या संबंधित विद्यार्थ्यांची वैयक्तिक असल्याने उपलब्ध

करुन देण्यास असमर्थता दर्शविण्यात आली होती. परंतु आयोगाने सदरची माहिती आयोगास सादर करण्याबाबत आदेशीत केल्यास संचालनालयामार्फत सादर करण्यात येईल.

६. उपरोक्त माहिती वेळेत प्राप्त झाली नाही याकरीता अपीलार्थीनी दि. १४/११/२००८ रोजी अपील दाखल केले होते.

सदर अपीलावर संचालनालयामार्फत दि. २९/११/२००८ च्या पत्रान्वये योग्य ते अभिप्राय पुन्हा पाठविण्यात आले होते.

७. दि. ३०/१२/२००८ च्या अर्जान्वये अपीलार्थीनी पुन्हा दैनिक यशोभूमि, दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रांमधील बातमीचा संदर्भ देऊन प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. तसेच सदर अर्जामध्ये संचालनालयातील अधिकारी वर्गाची नावे उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

सदर अर्जावर संचालनालयामार्फत दि. २९/१/२००९ च्या पत्रान्वये मा. न्यायालयाच्या आदेशांचा संदर्भ देऊन प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देता येणे शक्य नसल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र त्याच निर्णयामध्ये न्यायालयाने विद्यार्थ्यास त्याच्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत व योग्य उत्तरांची आन्सर कि उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केले होते. मात्र संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिका-यांची नांवे त्यांच्या कालावधीसहीत कळविण्यात आली होती.

सामाईक प्रवेशपरीक्षेच्या कामाच्या एजन्सीच्या संदर्भात विभागाचे पुढीलप्रमाणे म्हणणे आहे.

सन २००६ मध्ये सामाईक प्रवेश परीक्षेचे काम हे तंत्रशिक्षण संचालनालया करिता सामाईक प्रवेश परीक्षांचे काम करणा-या एजन्सीकडे देण्यात आले होते. त्या एजन्सीकडून प्रवेश परीक्षांचे काम करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता व त्यांचेबरोबर सदरचे काम हे पुढील तीन वर्षाकरीता करार करण्यात आला होता. सदर एजन्सीमार्फत खालीलप्रमाणे कामे करण्यात येतात.

१. प्रवेश परीक्षेच्या अर्जांची स्कॅनिंग आणि डेटा एन्ट्री
२. स्कॅनिंग आणि डेट एन्ट्री केलेल्या अर्जांचा एकत्रित डेटा उपलब्ध करुन देणे.

३. स्कॅन अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त माहितीवरुन विद्यार्थ्यांचे प्रवेश पत्र तयार करणे.

४. परीक्षेसाठी निवड करण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांवरील विद्यार्थ्यांची उपस्थिती तक्ता तया करणे.

वरील सर्व कामे करुन घेण्याकरीता कोणत्याही एजन्सीची नियुक्ती करण्यापूर्वी सदर एजन्सीस प्रवेश परीक्षांच्या कामाचा असलेला अनुभव, सदर एजन्सीची विहित वेळेत काम पूर्ण करुन देण्याची क्षमता, काम करण्याची कार्यपध्दती, असलेली विश्वासार्हता या सर्व बाबींचा काटोकोरपणे विचार करण्यात येतो. या पध्दतीमध्ये एजन्सीची नियुक्ती करताना निविदा पध्दती वापरण्यात येत नाही. कारण निविदा पध्दतीमध्ये कोणताही अनुभव नसलेल्या एजन्सीची निविदा मान्य झाल्यास सदर निविदाकारास काम देणे बंधनकारक नसलेल्या एजन्सीची निवीदा मान्य झाल्यास सदर निविदाकारास काम देणे बंधनकारक असते. परंतु जर सदर एजन्सीने निर्धारित कालावधीत काम पूर्ण करुन न दिल्यास त्याचा परिणाम सामाईक प्रवेश परीक्षेच्या वेळापत्रकावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर असे झाल्यास त्यामध्ये कार्यालयाची पर्यायाने शासनाची प्रतिमा डागाळण्याची शक्यता असते.

या सर्व बाबींचा विचार करता सामाईक प्रवेश परीक्षेच्या कामाकरिता एजन्सी नियुक्त करताना निविदा प्रक्रिया राबविण्यात येत नाही. तसेच सदर एजन्सीचे नाव गोपनीयतेच्या दृष्टीने जाहिर करण्यात येत नाही.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व वरील निवेदन विचारात घेतल्यानंतर पुढील निर्देश देण्यात येत आहेत.

एखादया कामाचे स्वरुप लक्षात घेता निविदा मागवून काम करुन घ्यायचे किंवा विवक्षित एजन्सी नेमायची याबाबतचा निर्णय विभागाने घेतलेला आहे. मात्र हा निर्णय घेतल्यानंतर ज्या एजन्सीकडे हे काम देण्यात आलेले आहे त्या एजन्सीला कोणत्या अटी व शर्तीनुसार काम करण्यात आलेले आहे ही माहिती गोपनीय ठेवण्याचा निर्णय हा योग्य नाही. प्रशासनात पारदर्शकता असण्याच्या दृष्टीने दिलेले टेंडर हे कोणाला देण्यात आलेले आहे व त्याच्या अटी व शर्ती काय आहेत हे सर्व जनतेला कळायला पाहिजे. त्यामुळे अपीलार्थीच्या

दि. ८/१०/२००८ रोजीच्य अर्जातील मुद्दा क्र. A व B येथील माहिती अपीलार्थीस देण्यात यावी.

प्रश्नपत्रिकेची प्रत न देण्याचा जन माहिती अधिका-यांचा निर्णय हा मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाशी सुसंगत आहे. अन्य विद्यार्थ्यांच्या बारावी गुणपत्रिकेची प्रत उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आलेली होती. मात्र ती माहिती वैयक्तिक असल्याचे कारण दाखवून माहिती देण्यास असमर्थता दर्शविण्यात आलेली होती. मात्र सुनावणीच्या वेळेला आयोगाने आदेश दिल्यास ही माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केलेले आहे. ही माहिती अपीलार्थीस देण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी वर दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.**

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/७२९**

**श्री. शंकरराव भिमाजी आव्हाड ----अपीलार्थी**
**मु.पो. दापूर, ता. सिन्नर,**
**जिल्हा नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक -----उत्तरवादी**
**सहकारी संस्था नाशिक, जि. नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक**
**सहकारी संस्था सिन्नर, जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १५/१२/२००८**

**सुनावणीचा दिनांक २४/६/२००९**

**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी दि. १५/९/२००८ च्या अर्जान्वये महाराष्ट्र अधिसूचित संस्थांच्या निवडणूका (महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१) अन्वये निवडणूकीतील कोणकोणती कागदपत्रे सीलबंद केली जातात याबाबतची माहिती तसेच सिन्नर तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणूकीशी संबंधित नामनिर्देशनपत्रे, छाननी अंती बाद झालेले अर्ज इत्यादी माहिती व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली. ही माहिती देण्याची बाब या कार्यालयाच्या कक्षेत येत नाही असे कारण नमूद करुन त्यांचा अर्ज दप्तरदाखल करण्यात आला व तसे अपीलार्थीना दि. १७/९/२००८ रोजी कळविण्यात आले. यावर त्यांनी दि. ३०/९/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावरील निर्णयाबाबत**

अपीलार्थींना अवगत न केले गेल्यामुळे त्यांनी दि. १५/१२/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असे सांगण्यात आले की, अपीलार्थींना कोणतीही कागदपत्रे नको आहेत. त्यांना उत्तरे पाहिजे आहेत.

कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून आले की, अपीलार्थींनी त्यांच्या मुळ अर्जात विचारलेल्या माहितीवर मुद्देसूद उत्तर देण्यात आले नाही. तरी आता असे निर्देश देण्यात येतात की, सदर आदेशाच्या तारखेपासून १० दिवसांचे आत अपीलार्थींनी विचारलेल्या मुद्दयावर मुद्देसुद माहिती देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० जून , २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-रामाआ/अपील/नाशिक २००९/सीआर/६९७**

**श्री. पंढरीनाथ बाबूराव बोडके ----अपीलार्थी**
**मु. मोह, पो. चिंचोली, ता. सिन्नर,**
**जिल्हा नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक -----उत्तरवादी**
**पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय, ग्रामीण विभाग,**
**नाशिक - ४२२ ००१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी**
**ग्रामीण विभाग नाशिक, जि.नाशिक - ४२२ ००१.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. पंढरीनाथ बाबूराव बोडके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४/४/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन जॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २४/६/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ५/११/०७ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली माहिती मागितली होती.

" दि. १२/६/२००७ रोजी मौजे मोह, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे झालेल्या जमिनीच्या वादातून दोन्ही गटातील मारामारीची घटना व त्याच दिवशी घोटी पोलीस स्टेशन

अंतर्गत आग्रा रोड येथे झालेल्या अपघाताची घटना हया दोन्ही घटनांचे सरकार वाडा पोलीस स्टेशन अंतर्गत येणा-या नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालय हयाठिकाणी येणारे रुग्ण हयासंबंधीची मा.पोलीस अधीक्षक नाशिक यांच्या कार्यालयाला सिन्नर पोलीस स्टेशन, घोटी पोलीस स्टेशन व सरकारवाडा पोलीस स्टेशन येथून आपल्याला मिळालेले बिनतारी संदेश (वायरलेस मॅजेस) व आपण त्यांना दिलेल्या प्रतिउत्तराच्या व अन्य माहितीच्या नकला मिळणेबाबत. "

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. ३/१/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद दोन मध्ये नमूद केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलार्थीस माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० जून , २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त